नेवार

जून १९७८

वा रुपया



वर्षारंभ

अंक

अठरा

# माणूस

साप्ताहिक माणूस

वर्ष अठरावे–अंक एक

३ जून १९७८

मूल्य १·२५ पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
◻
वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**
◻
प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
◻
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
◻
**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
◻
दूरध्वनी : ४४३४५९
◻

# प्रभात....

अठराव्या वर्षाचा हा पहिला अंक, एक-लेखकी विशेषांक म्हणून प्रसिद्ध होत आहे. असे 'माणूस' विशेषांक पूर्वीही निघालेले आहेत. अरुण साधू यांनी लिहिलेली व्हिएतनाम युद्धाची समग्र कथा एकाच अंकात दिली गेलेली होती. आणि बिजनौर-च्या स्वामी सच्चिदानंदांची स्फूर्तिदायक जीवनगाथा अशाच एका वर्षारंभ विशेषांकाचा एकमेव विषय होता. (५ जून १९७१) हे दोन्ही विशेषांक एकलेखकी पण एकाच विषयाबर केंद्रित झालेले होते. प्रस्तुत वर्षारंभ अंक मात्र एक-लेखकी असला तरी त्यात अनेक विषय येत आहेत. मराठी तरुणांच्या वाट्याला सहसा न येणाऱ्या आंतरराष्ट्रीय जीवनाचा तरुण-पणीच लेखकाला अनुभव घेता आला. जग बघण्याची, निरनिराळ्या संस्कृती – त्यांनी घडविलेली माणसे पाहण्याची एक दुर्मिळ संधी लेखकाला प्राप्त झाली. हे त्याने पाहिलेले जग कसे आहे? या जगात त्याला भेटलेली भिन्नभिन्न संस्कृतींची माणसे कशी वागतात, ती खातातपितात काय, आपल्याविषयी त्यांच्या भावना कोणत्या? सायगावपासून तेहरानपर्यंत बारा / पंधरा वर्षे लेखक व्यव-सायानिमित्त भटकला. या भटकंतीतले हे विविध अनुभव वाचकांना रोचक वाटतील, थोडे अंतर्मुखही करतील. 'आपण कोण?' याचा शोध घेण्यास उपयुक्तही ठरतील.

'आपण कोण?' हा एक कधी न संप-णारा शोध आहे. सिद्धान्तांची रटाळ चर्चा किंवा निर्बुद्ध उसनवारी न करता जिवंत अनुभव व माहिती यांच्याद्वारा असा शोध घेणारे साहित्य आवर्जून प्रसिद्ध करण्याचा 'माणूस'ने आजवर यथाशक्ती प्रयत्न केलेला आहे. १७ वर्षांपूर्वी, पहिल्या अंकाच्या मुखपृष्ठावर 'माणूस'ने आपल्या वाटचालीची दिशा स्पष्ट करणारे पं. जवाहरलाल नेहरू यांचे एक अवतरण दिलेले होते. हे अवतरण पं. नेहरूंच्या 'भारत, आज आणि उद्या' या आझाद व्याख्यानमालेतील एका भाषणातून घेतलेले होते. आजही ते अवतरण तितकेच अर्थपूर्ण वाटते. अवतरण असे आहे : 'मती कुंठित करून टाकील असा आमचा हा वर्तमानकाल आहे. भविष्याकडे आमची दृष्टी लागली आहे आणि भूतकालालाही आम्ही विसरू शकत नाही. भूतभविष्याच्या रस्सी-खेचीत आम्ही सापडलो आहोत. हा संघर्ष कसा सोडवायचा आणि आमच्या आधि-भौतिक गरजा भागविणारा परंतु त्याबरोबर आमची आध्यात्मिक धारणा कायम राख-णारा जीवनमार्ग कसा शोधून काढायचा हाच आमच्यापुढे प्रश्न आहे. कोणती नवी ध्येये किंवा नव्या जगाला अनुरूप होतील अशा रीतीने फेरबदल करून कोणती जुनी ध्येये आम्हाला जनतेपुढे ठेवता येतील आणि जन-तेला कशा रीतीने जागृत आणि कार्यप्रवृत्त करणे आम्हाला शक्य होईल हा प्रश्न आमच्यापुढे आहे ... !!'

भूतभविष्याची सांगड घालणारा आणि विशेष म्हणजे येथील जनतेला कार्यप्रवृत्त करू शकणारा जीवनमार्ग शोधणारे साहित्य 'माणूस'ने गेल्या १७ वर्षांत किती दिले? पाठ थोपटून घ्यावी इतके दिले की नाही हे काळच ठरविणार; पण पुढे वाटचाल चालू ठेवण्याची उमेद टिकून राहावी इतके नक्की दिलेले आहे आणि वेळोवेळी प्रसंगा-प्रसंगाने त्याची नोंदही झालेली आहे. त्यामुळे विषयांच्या निवडीत, लेखनप्रकारात माणूसला वरचेवर बदलही करावे लागले. नवेनवे लेखक शोधणे, जुन्यांकडून नवे विषय घेणे हा तर 'माणूस'चा हव्यासच आहे. तरी-पण अधूनमधून चाकोरी पडत राहतेच. चाकोरी मोडली की, जुने वाचक नाराज होतात, नवीन उपक्रम नेहमीच यशस्वी ठरतात असेही नसते. ओढाताण ओघाने येतेच. तरीपण या ओढाताणीतून सुवर्णमध्य गाठून सतरा वर्षे हा प्रवास अव्याहतपणे झाला. कुठल्याही गटाला, पक्षाला किंवा व्यक्तीला – मग ती व्यक्ती कितीही श्रेष्ठ असो – बांधून न घेतल्यामुळे प्रवास तसा एकाकीच होणेही अपरिहार्य होते. लेखक-मित्र, हितचिंतक, सर्वसामान्य वाचक यांचे पाठबळ लाभले म्हणून आजवर तरी असा स्वतंत्र एकाकी प्रवास झेपला. पुढचे कुणी सांगावे?

'मती कुंठित करून टाकील असा आमचा हा वर्तमानकाळ आहे ...'

**–श्री. ग. मा.**



हे आहेत विजय परुळकर. गेली चौदा वर्षे टर्की ते कोरिया या आशियाई प्रदेशांची भटकन्ती करीत जिप्सी जीवन जगलेले. अंकारा, तेहरान, बँकॉक, जाकार्ता, मनिला, हाँगकाँग, टोकिओ अशी विमानप्रवासाची फक्त विमानतळेच पाहत नव्हे तर कामाच्या संदर्भात तेथील लोकांच्या सहवासात राहून त्या देशाचे खेडे न् खेडे भटकलेले.

चोविसाव्या वर्षी जर्मन टेलिव्हिजनचा धाडसी कॅमेरामन म्हणून त्यांनी सरळ युद्धाने धगधगलेल्या दक्षिण व्हिएतनामची राजधानी सायगाव गाठली. तेथील दररोजच्या हालचाली अन् एक घाणेरड्या युद्धाचे वास्तवचित्रण सर्वांना पुरविले. नंतर ६५ चे भारत-पाक युद्धही टिपले. बाकीच्या आशियाई देशांशी, त्यांच्यावरील सांस्कृतिक कार्यक्रम व प्रमुख व्यक्तींचा परिचय करून देता देता दोस्ती झाली. कंबोडियात तर पाश्चिमात्त्य वार्ताहरांना त्यांनी पुरविलेल्या एकांगी माहितीबद्दल हाकलून लावले गेले होते; त्याच

# अंकारा....तेहरान....बँकॉक....जाकार्ता....कंबोडिया....

वातावरणात प्रिन्स सिंहानुक यांनी फक्त परुळकरांना परवानगी दिली.

वास्तव्य त्या वेळी दिल्लीत; पण स्वतःला जेवढा भारतीय म्हणून घेण्याचा अभिमान, तेवढाच आंतरराष्ट्रीय वर्तुळात I am a proud Asian म्हणून ओळख करून द्यायचा आग्रह त्यामुळेच की काय, युनोची नोकरी मिळाल्यावर बँकॉक वास्तव्याचे ठिकाण होऊन टर्की, इराण, अफगाणिस्तान, नेपाळ, ब्रह्मदेश, श्रीलंका.......इत्यादी अनेक शेजार राष्ट्रातून 'मनसोक्त' संचार. या राष्ट्रांच्या वेगवेगळ्या प्रगतीच्या योजना (Developement Projects) संबंधित लोकांपर्यंत पोहोचविणे, त्यांच्यात सुसूत्रता व जवळीक पत्रके, पुस्तिका, छायाचित्रे, स्लाइडसेटस् अन् मुख्यतः फिल्मस् या माध्यमातून निर्माण करणे हा उद्योग.

नंतरचा मुक्काम पोस्ट तेहरान १९७३ ते १९७७. या मुक्कामात RDSCR (रिजनल डेव्हलपमेंट सपोर्ट कम्युनिकेशन सर्व्हिस) या युनोच्या योजनेची उभारणी. एका क्षेत्रातील काम हातावेगळे होत आहे तोच त्याच्यापासून संपूर्ण तफावत असलेला दुसरा विषय समोर !

परुळकरांनी या चार वर्षांत हाताळलेले हे विविध विषय :

१ : वाहत्या वाळूचे बंधनीकरण (sane-dune stabilization)

2 : Watershade Management.

३ : रबर उत्पादनातील प्रगती.

४ : औद्योगिक व्यवस्थापन.

५ : आहार योजना.

**6** : Industrial Safty.

७ : वैद्यकीय प्रशिक्षण.

८ : कुटुंबनियोजन.

**9** : Drug addiction.

विविध विषयांचे अभ्यास करताना आनंद होताच; पण तेवढ्याच असह्य व ताणांनी भरलेल्या कसरतीही होत्या. उदाहरणच द्यायचे झाले तर टर्की व इराण या देशांतील इस्लामिक धर्मियांसाठी कुटुंबनियोजन या नाजूक विषयाचे चित्रण.

चौदा वर्षे या उच्चभ्रू समाजात व वातावरणात राहूनही त्याविषयी ओढ न वाटल्याने सध्या पुन्हा मूळ पदावर. म्हणजे भारतात–महाराष्ट्रात–पुण्यात. पूर्वी 'माणूस'मधून त्यांनी स्फुट लेखन केलेही होते; पण त्या वेळी त्यांनी सांगायचे आणि त्यांचे मित्र अनिल हवालदार यांनी त्याला लेखस्वरूप द्यायचे अशी विभागणी होती. आता त्यांनी स्वतःच लेखणी हाती धरली आहे.

सरकारी नोकरांच्या संपाच्या वेळी संपनेते श्री. कर्णिक यांची त्यांनी घेतलेली मुलाखत नुकतीच 'माणूस'मधून येऊन गेल्याचेही वाचकांना आठवत असेलच.

त्यांच्या भटकन्तीतील हे काही निवडक अनुभव........

–सरोजा परुळकर



# सायगानमधील एक रात्र आणि एक दिवस

दक्षिण व्हिएतनामची राजधानी सायगॉन्. तिथे थिच् क्वान् डुक् नावाच्या बुद्ध भिकूने, स्वतःला मोठ्या समारंभपूर्वक जाळून घेतले. प्रेसिडेंट डियम् आणि मॅडाम न्हू ह्यांच्या राजवटीला उलथून पाडणाऱ्या बंडाळीची ही सुरुवात. मला टेलिव्हिजन कंपनीकडून तार आली– ' सायगॉन्ला जा. जळत्या भिकूंची फिल्म घेण्याचा प्रयत्न कर आणि पुन्हा आम्ही कळवीपर्यंत तिथेच रहा ! ' ताबडतोब तयारी करून मी निघालो. भारताबाहेरचा पहिला दौरा. जळता भिकू शोधून त्याची फिल्म घेण्याचे sensational काम.

सायगॉनमध्ये भाषेची अडचण. व्हियतनामीज आणि फ्रेंच ह्या दोनच भाषा. दोन्हींचा मला गंध नाही. माझे इंग्लिश निरुपयोगी. सायगॉनच्या विमानतळापासून हॉटेलपर्यंत टॅक्सीड्रायव्हरशी मराठीतून खूप गप्पा मारल्या. त्याने माझ्याशी व्हिएतनामीज भाषेत हास्यविनोद केले. सगळाच आनंद!

हॉटेलवर पोहचताच प्रेस एजन्सीला फोन करून एका दुभाष्या कम् असिस्टंटची मागणी केली. त्यांनी अर्ध्या तासात माणूस पाठविला. नाव लिन्ह, अर्धा चायनीज अर्धा व्हिएतनामीज. पाच भाषा उत्तम बोलणारा. जर्मन, फ्रेंच, इंग्लिश, चायनीज आणि व्हिएतनामीज. फोटोग्राफीची थोडीफार माहिती असलेला. त्याचा दिवसाचा रेट दहा डॉलर आणि इतर खर्च– जवळजवळ शंभर रुपये ! लिन्हनं आल्याबरोबर पहिला सल्ला दिला–'सायगॉन्मध्ये काम करायचे असेल तर हाताशी चोवीस तास गाडी पाहिजे. इथे केव्हा काय घडेल ह्याचा नेम नाही! मी मान्य केले. लिन्हने ताबडतोब फोन करून एक भली मोठी गाडी चोवीस तासांसाठी कायमची ठरवून टाकली. दिवसाचा दर पंधरा डॉलर–११५ रुपये, दिवसाच्या कमीत कमी दोनशे पंधरा रुपये खर्चाने माझ्या परदेशातील पहिल्या दिवसाची सुरुवात झाली !

' What in yow assignement ? ' – लिन्हने प्रश्न विचारला.

' To film a burning monk ' – मी सहजपणे उत्तर दिले.

आणि जणू काही कोपऱ्या-कोपऱ्याला ' बर्निंग मंकस ' हातात काड्यापेटी घेऊन TV cameraman ची वाट पहात बसलेत अशा थाटात लिन्ह म्हणाला– ' O. K. let us go ! '

दिवस मावळेपर्यंत सायगॉनमध्ये गरागरा फिरलो– पण ' जळता भिकू ' भेटला नाही ! दोन-तीन पॅगोडामध्ये जाऊन लिन्ह विचारून पण आला. ' तुमच्या इथे कुणी भिकू जाळून घेणार आहे का ?' no luck ! रस्त्यातल्या बऱ्याच भिकूंना थांबवून आम्ही विचारले, त्यांच्या ओळखीचा एखादा भिकू जाळून घेणार आहे का ?' NO LUCK.

थकून–भागून हॉटेलवर परतलो. लिन्हने मला आपल्या घराचा पत्ता आणि फोननंबर दिला, ' सकाळी लवकर येतो '– म्हणून तो निघून गेला. मी व्हिस्कीची बाटली खोलली, एक मस्त डब्बल पेग मारला, स्वच्छ अंघोळ केली आणि बाहेर पडलो.

हॉटेलच्या कोपऱ्यावरच एका रिक्षावाल्याने अडविले ' Mister, want a girl...Virgin prine chinese, prine french...very beautiful virgin " मी त्याला सांगितले ' I need a very good burning monk ' ' O. K. O. K. I take you. very good vergin monk ' म्हणत तो मला जबरदस्तीने रिक्षाकडे खेचू लागला. कठीण प्रसंग ! त्याला फक्त very good आणि vergin ह्या दोनच शब्दांचा अर्थ माहीत असणार ! त्याच्या हातून कशीबशी सुटका करून घेत मी टचू डो रस्त्यावर वळलो. बहुतेक दुकाने बंद झाली होती. स्वच्छ रस्ता, तुरळक रहदारी. बराच वेळ भटकून मी एका बारमध्ये शिरलो. अतिशय शांत वातावरण, मंद प्रकाश, soft music एका अतिशय देखण्या पोरीने बियर आणली, माझा ग्लास भरला आणि फ्रेंचमध्ये मला काही तरी विचारले. मी मानेने नकार दिला – तिने काय विचारले होते देव जाणे ! गोड हसून ती पोरगी दूर झाली. थोड्या वेळाने दुसरी एक गोड पोरगी आली– बाहुली-

सारखी नाजूक आणि सुंदर, काळ्याभोर लांब केसांची ' मी तुमच्या-जवळ बसू का ? ' तिने इंग्लिशमध्ये प्रश्न विचारला आणि माझ्या उत्तराची वाट न पहाता ती माझ्या बाजूच्या खुर्चीवर बसली. वातावरण फ्रेंच अत्तराच्या मादक सुगंधाने धुंद झाले. तिचे नाव लिली. लिलीने माझ्यासाठी एक बियर मागविली आणि स्वतःसाठी एक पेय मागविले. मी लिलीबरोबर खूप गप्पा मारल्या. लिली माझा ग्लास रिकामा होऊ देत नव्हती आणि दरखेपेला स्वतःसाठी एक पेय मागवीत होती. सहज घड्याळात पाहिले— अकरा वाजून गेलेले. मी उठलो- चिक्कार बियर प्यालो होतो. चालताना तोल जात होता. लिलीबरोबर दोन-अडीच तास गप्पा मारण्याचे बिल पन्नास डॉलर झाले होते (साडेतीनशे रुपये ). कसाबसा हॉटेलवर येऊन पोहोचलो. कोपऱ्यावर तोच रिक्षावाला भेटला— ' Hey Mister you want chinese virgin – very beautiful ' – त्याच्याकडे दुर्लक्ष करीत मी हॉटेलात शिरलो. खोली गाठली आणि बूट, पँट, शर्टसकट बिछान्यावर ताणून दिली. खोली गरगरत होती. डोक्यात अनेक विचारांची अस्पष्ट गुंतागुंत चालली होती. मधूनमधून लिलीचा चेहरा डोळ्यांसमोर येत होता – तिच्या शरीराचा मादक गंध आठवत होता.

पहाटे उठून ब्रेकफास्ट आटोपला आणि कॅमेरा घेऊन सात वाजता लाऊंजमध्ये लिन्हची वाट पहात थांबलो. माझ्यासारखे साठ-सत्तर आन्तरदेशीय कॅमेरामन आणि तीस-चाळीस वर्तमानपत्रकार लाऊंजमध्ये आपआपल्या ' लिन्ह 'ची वाट पहात थांबले होते. जळत्या भिकूच्या शोधात जगभराची रिपोर्टर मंडळी, एका लहानशा देशाच्या लहानशा राजधानीत जमली होती आणि त्या राजधानीतल्या एकमेव हॉटेलमध्ये उतरली होती. The entire caravelle hotel was taken over by international Press. शंभर-सव्वाशे इंटरनॅशनल जर्नलिस्टस् एकत्र असून सुद्धा Caravelle ची लाऊंज शांत होती. कोण कुणाशी बोलत नव्हते. प्रत्येकाचा चेहरा गंभीर. प्रत्येकाला जळता भिकू पाहिजे होता; पण ' आपला ' भिकू दुसऱ्याला मिळू नये अशी प्रत्येकाची इच्छा होती.

पहिला जळता भिकू – थिच क्वान डुक, लॅरी बरोज ह्या ' लाइफ ' मासिकाच्या फोटोग्राफरने टिपला होता. थिच् क्वान् डुकने स्वतःला समारंभपूर्वक जाळून घेतले तेव्हा सुरुवातीपासून शेवटपर्यंतचे सर्व फोटो घेण्यासाठी फक्त एकटा लॅरी बरोज हजर होता. लॅरीच्या फोटोंनी सारे जग दणाणून सोडले होते. थिक कॉन डुक दिवसाढवळ्या, सायगॉनच्या भर बाजारचौकात, स्वतःवर पेट्रोल ओतून स्वतःच्या हाताने स्वतःला पेटवून मेला होता ! जळत असताना तो पद्मासन घालून, हात जोडून बसला होता बुद्धासारखा. अंगातील हाडांचा कोळसा झाला तरी त्याची मांडी सैल झाली नाही. नमस्कारात जोडलेले हात सुटले नाहीत. लॅरी बरोजला हे सगळे फोटो ' शांतपणे घेण्याचा अप्रतिम मोका मिळाला होता. थिच् क्वान् डुक स्वतःला जिथे जाळून घेणार होता तिथे लॅरी दोन तास अगोदर पोहचला होता. काही वेळाने पोलिसांच्या एका तुकडीने येऊन बाजारपेठेतल्या त्या चौकाभोवती गस्त घालण्यास सुरुवात केली. लॅरीच्या कॅमेऱ्याने पोलिस टिपले. थोड्या वेळाने दहा-बारा गाड्या भरून बुद्ध भिकू आले. एका गाडीतून थिच् क्वान् डुक उतरला. दोन भिकूंनी त्याला ' धरून ' चौकात आणला. थिच क्वान डुक पद्मासन घालून बसला. इतर भिकूंनी त्याची पूजा केली – लॅरीचा कॅमेरा हे सर्व टिपीत होता. चौकामध्ये बघ्यांची गर्दी जमली. एका भिकूने थिच क्वान डुकच्या अंगावर डबाभर पेट्रोल ओतले आणि त्याच्या हातात लायटर दिला. थिच क्वान डुकने लायटर पेटविला – भगव्या वस्त्राने पेट घेतला – त्याने नमस्कारात हात जोडले आणि तो पेटत राहिला – पाच मिनिटांनी त्याचे पेटणारे शरीर कोलमडले. बाजूला उभ्या असलेल्या भिकूंनी आग विझविली आणि अर्धवट कोळसा झालेले त्याचे शरीर गाडीत घालून ते निघून गेले. लोकांची पांगापांग झाली. पोलिसांची तुकडी ट्रकमध्ये बसून निघून गेली. चौकात पूर्ववत रहदारी सुरू झाली.

एक बुद्ध भिक्षु जळून मेला होता आणि त्याचे मरण टिपायला फक्त ' लाइफ 'चा फोटोग्राफर हजर होता. इतर कुठल्याही वर्तमानपत्राचा फोटोग्राफर त्या दिवशी सायगॉनच्या बाजारपेठेतल्या चौकात हजर नव्हता. मोठी अजब घटना ! थिच क्वान डुक मेला आणि लॅरी बरोज प्रसिद्धीस आला!

लॅरीचे फोटो जगभर प्रसिद्ध झाले आणि पुढील चोवीस तासांत जगभरचे वर्तमानपत्रकार, फोटोग्राफर्स, कॅमेरामन सायगॉनला पोहोचले. आम्हाला प्रत्येकाला जळता भिकू पाहिजे होता – लॅरीला मिळाला तसा !

माझी टेलिव्हिजन् कंपनी जळत्या भिकूच्या फिल्मची आतुरतेने वाट पहात होती आणि माझ्याप्रमाणेच ' जळत्या भिकू 'च्या चिंतेने ग्रासलेले जगभरचे वर्तमानपत्रकार आणि रिपोर्टर्स, नरबळी टिपण्याची आपआपली ' हत्यारे ' सज्ज ठेवून, गंभीर चेहऱ्याने, आपआपल्या ' लिन्हची ' वाट पहात कॅरॅव्हेल हॉटेलच्या लाऊंजमध्ये येरझाऱ्या घालीत होते.

दुसरा भिकू नक्की जळणार होता. तो जळत असताना फक्त आपण तेवढे तिथे असावे अशी प्रत्येकाची महत्त्वाकांक्षा होती. भिकू मरणार होता आणि त्याच्या बलिदानावर आमच्यापैकी प्रत्येकाला आपली करिअर करायची होती. माझ्या करिअरसाठी जळत्या भिकूची आवश्यकता होती. एखादा भिकू तयार झाला असता तर आमच्यापैकी प्रत्येकाने मोठ्या आनंदाने त्याच्या अंगावर पेट्रोल ओतले असते आणि स्वतःच्या हाताने काडी लावली असती...

...साडेसात वाजता ' माझा लिन्ह ' आला, पाठोपाठ इतरांचे ' लिन्ह ' पण आले. प्रत्येकाची ' चोवीस तास ' बुक केलेली मोठी गाडी. प्रत्येक गाडीवर प्रेसचा शिक्का आणि त्या त्या रिपोर्टरच्या एजन्सीच्या नावाची पाटी. क्षणार्धात कॅरॅव्हेल् हॉटेलची लाऊंज रिकामी झाली. जगभरचे बातमीदार जळत्या भिकूच्या शोधात सायगॉनला गोल गोल चकरा मारू लागले. संध्याकाळी दमून–थकून मी हॉटेलवर परतलो. इतर पण परतले. प्रत्येकाचा चेहरा माझ्यासारखाच – जळता भिकू न मिळाल्याने उदास ! तिसऱ्या दिवशी तोच प्रकार. चौथ्या दिवशी पण तोच प्रकार !

– आणि पाचव्या दिवशी एक भिकू जळला ! फक्त B.B.C. NBC चे TV कॅमेरामन आणि एक फ्रीलान्स फोटोग्राफर त्या



ठिकाणी होते. दोन्ही TV cameraman ना बध्यांनी मारहाण करून त्यांचे कॅमेरे मोडले; पण ही बातमी आणि त्या फ्री लान्सरने घेतलेले दुसऱ्या जळत्या भिकूचे फोटो जगभर प्रसिद्ध झाले. मला माझ्या टेलिव्हिजन कंपनीकडून लांबलचक तार आली – थोडक्यात अर्थ – 'भिकू जळत असताना तू कुठे होतास? सायगॉनला तुला पाठवून आम्ही झक् मारली!! B. B C; NBC च्या कॅमेरामनबरोबर तू का तिथे नव्हतास?' इ. इ. मी रात्री बारमधे जाऊन मिलीबरोबर वटवट करण्यात पन्नास डॉलर उधळले आणि कंपनीच्या तारेला उत्तर पाठवायचे नाही असे ठरविले.

तिसरा भिकू जळाला, मला मिळाला नाही. चौथा जळाला – तो पण चुकला. टेलिव्हिजनकडून वाईट तारांचा पाऊस! माझी आणि लिलीची जानी दोस्ती. रोज सायगॉनमध्ये गरगर फिरणे चालू! माझ्यापेक्षा लिन्ह् जास्त नर्व्हस् ......

आणि मग सायगॉन आठवडाभर शांत. सगळे सामसूम. मॅडाम न्हूने प्रेस कॉन्फरन्स बोलाविली. असामान्य तेजस्वी बाई, क्रूर, सुंदर आणि धीट दुधाळ रंगाची, गोल चेहऱ्याची, कर्कश आवाजाची, लांबसडक बोटांना टोकदार नखे – वाघिणीसारखी, बोलताना उजव्या हाताचा 'पंजा' उगरायची सवय. Very dynamic. मी एकदम तिच्या प्रेमात पडलो. महाभयानक बाई!

दक्षिण व्हिएतनामच्या प्रेसिडेंट डियमची ही भावजय. धाकटा भाऊ न्हू याची बायको. न्हू, प्रेसिडेंट डियमचा पोलिटिकल अॅडव्हायझर आणि मॅडाम न्हू, प्रेसिडेंटची प्रेयसी – ही बया डियमबरोबर रहायची. हिची सत्ता मोठी. धर्माने रोमन कॅथलिक. सायगॉनमध्ये रात्री दहानंतर नाचगाण्यावर बंदी. खुल्या वेश्याव्यवसायावर बंदी. सायगॉन स्वच्छ, रस्ते स्वच्छ, बारस् स्वच्छ, नाइट क्लबस् स्वच्छ. कडक कायदा, कडक शिस्त! बुद्ध लोकांवर बाईचा राग. बुद्ध भिकूंना 'भगव्या वस्त्राआड दडलेले कम्युनिस्ट देशद्रोही!' असे ती म्हणायची. कर्नेल टॉन् थॉट् डिन्ह् नावाचा प्रेसिडेंटचा special security ऑफिसर, त्याच्या मदतीने मॅडाम न्हूने एका मोठ्या पॅगोडावर धाड घातली. पॅगोडामधे तिला अनेक शस्त्रास्त्रे, दारूगोळा आणि सरकारविरुद्ध छापील पत्रके इत्यादी पुरावा मिळाला. बाईने पॅगोडाच्या मुख्याला कैद केली आणि इतर चाळीस भिकूंची भरबाजारात धिंड काढली! अनेक नामांकित बुद्धधर्मीयांना तिने तुरुंगात टाकले. व्हिएतनाममध्ये ६०% लोक बुद्धधर्मीय, ४०% ख्रिश्चन. मॅडाम न्हू ख्रिश्चन – सगळे बुद्धधर्मीय तिच्याविरुद्ध असा झगडा. त्यात भर म्हणून दक्षिण आणि उत्तर व्हिएतनाममधे तंग वातावरण. व्हिएतकॉंगच्या चळवळीची सुरुवात.

अमेरिकेचा Defence Secretary रॉबर्ट मॅकनमारा 'महत्त्वाची' बोलणी करण्यासाठी सायगॉनला आला. विमानतळावरची प्रेस-कॉन्फरन्स त्याने उडवाउडवीची उत्तरे देऊन संपविली आणि तो तडक प्रेसिडेंटच्या महालावर गेला. आम्ही प्रेसवाले त्याच्या पाठोपाठ प्रेसिडेंटच्या पॅलेसवर पोहोचलो. तीन तासांनंतर प्रेसिडेंट डियम आणि मॅकनमारा बाहेर आले. दोघांनी कॅमेऱ्यासाठी चेहरे हसरे केले, एकमेकांना थोपटले, अनेक वेळा शेकहँड केले – but no comments about their talks. मॅकनमारा अमेरिकन embassy वर परतला आणि डियम आपल्या पॅलेसमध्ये! सध्याकाळी मॅकनमाराने सायगॉन् सोडले – without a single comment about his visit ...

त्या रात्री बारा-साडेबाराच्या सुमारास माझ्या खोलीचा दरवाजा कुणी तरी जोरजोरात ठोठावला. दरवाज्यात लिन्ह् घामेघूम आणि excited. खोलीत शिरताच घटाघटा ग्लासभर पाणी प्याला – 'झोपू नकोस, भयंकर काही तरी घडणार आहे – कॅमेरा आणि लाइटस् तयार ठेव–कपडे करून तयार रहा; पण मी परत आल्याशिवाय खोलीच्या बाहेर पडू नकोस! Do not go out alone...it could be dangerous!' आणि तो बाहेर पडला. मी room-service ला फोन करून कॉफी मागविली, aspirin च्या दोन गोळ्या गिळल्या. तोंडावरून गार पाण्याचा हात फिरविला, कपडे केले, equipment तयार केली आणि सिगारेटस् फुंकत बसून राहिलो.

रात्री दीड-दोनच्या सुमारास, दूरवर कुठे तरी मोठा फटाका फुटल्याचा आवाज आला – खिडकीची तावदाने थरारली – पाठोपाठ फटाक्याच्या माळाच्या माळा उडाल्याचे आवाज! मी चटकन उठून गॅलरीत गेलो. अकराव्या मजल्याच्या उंचीवरून मला सायगॉनमधे दिवाळी साजरी होत असल्याचा भास झाला. कोपऱ्या–कोपऱ्याला सायगॉन पेटले होते. It was war–a military revolution. बघता बघता कॅरॅव्हेल हॉटेलसमोरचा चौक मिलिटरी टॅंकस् आणि सोल्जर्सनी भरू लागला. The troops were in full battle uniform. त्यांचा रोख प्रेसिडेंटच्या पॅलेसच्या बाजूला होता. तोफा डागत टॅंकस् हळूहळू पुढे सरकत होत्या. त्यांच्या बाजूने ऑटोमॅटिक रायफलच्या आणि मशिनगनच्या फैरी झाडीत सोल्जर्स positions घेत होते. रात्रीच्या अंधारात टॅंकस्च्या तोफांच्या तोंडातून उसळणारी आग आणि मशीनगन फायरचा चकचकाट एवढेच दिसत होते. प्रेसिडेंटच्या पॅलेसच्या बाजूने प्रतिहल्ला सुरू झाला. आकाश पेटले! मी अस्वस्थ...लिन्ह्ला शिव्या घालीत गॅलरीत हात चोळीत उभा. I wanted to go out and start filming – पण लिन्ह्ची वॉर्निंग आठवत होती – मी आल्याशिवाय एकटा बाहेर पडू नकोस – 'it could be dangerous' – काय करावे सुचेना.

इतक्यात लिन्ह् आला. मी त्याला ताबडतोब बाहेर पडण्याचे सुचविले...' No, No, No...very dangerous. Let us go on the Roof Top Bar–every journalist is there–नाखुषीने मी त्याच्याबरोबर सोळाव्या मजल्यावरच्या बारमधे गेलो. बार गच्च भरला होता–everyone was there–प्रत्येकजण गोंधळलेला. बातमीदारांपैकी जेव्हढे लेखणीबहाद्दर होते त्यांना कसलाच प्रॉब्लेम नव्हता–बारमध्ये बसून त्यांनी आपापले reports लिहायला सुरुवात केली होती. प्रश्न होता फोटोग्राफर आणि कॅमेरामन लोकांचा. त्यातल्या त्यात फोटोग्राफरचे काम जास्त सोपे–त्यांचे कॅमेरे लहान, चपळाईने फोटो घेणे सोपे. कॅमेरामनचा प्रॉब्लेम सर्वांत कठीण-फिल्म शूट करताना प्रत्येक घटनेचे संपूर्ण चित्रीकरण करणे अत्यंत जरुरीचे. एका शॉटने काम भागत नाही–प्रत्येक प्रसंगाचा 'sequence' बनविला पाहिजे. कॅमेरा अवजड–अडचणीच्या प्रसंगी जीव बचावण्यासाठी चटकन चपळ हालचाल करणे जवळजवळ अशक्य.

मी बारमनकडून एक डब्बल व्हिस्की घेतली आणि बाजूच्या एका गोऱ्या TV cameraman ला विचारले, 'are you planning

to go out'–क्षणाचाही विलंब न लावता त्याने उत्तर दिले– 'certainly, not..I am here to cover news, not to die —I will step out when it is all over!' इतर तिघा-चौघांनी पण हेच उत्तर दिले. एक जर्मन कॅमेरामन तयार होता, दोन अमेरिकन फोटोग्राफर्स पण तयार होते आणि बघता बघता आमचा सात-आठ जणांचा ग्रुप तयार झाला आणि आम्ही बाहेर पडलो! शक्यतो सर्वांनी एकत्र रहायचे; पण तरी 'Each on his own' असे ठरले.

आयुष्यात पाहिलेली पहिली लढाई! शिकारीची बंदूक वेगळी–लढाईची वेगळी–जंगलामध्ये आपण बंदूकधारी असतो आणि एखादी-दुसरी गोळी झाडतो–इथे आपण सोडून इतर सर्व बंदूकधारी आणि गोळ्यांचा पाऊस! हँडग्रेनेडस्, मॉर्टर्स, रॉकेटस्, Tank gunfire, मशीनगन्, बुलेटस् ह्या कशाचाच मला अनुभव नव्हता–आणि कदाचित त्यामुळेच भीतीपण वाटत नव्हती. 'अज्ञानात सुख' म्हणतात तशातल्या प्रकार.

लिन्हच्या हातात लाइट दिला आणि मी निघालो. रस्त्यामध्ये जे जे घडेल ते सर्व 'शूट' करायचे ठरविले. चार–साडेचारच्या सुमारास डियमच्या पॅलेसपर्यंत येऊन पोहचलो. तटाआडून जोरदार प्रतिहल्ला येत होता–mostly wild machine-gunfire. पॅलेसबाहेरचे सोल्जर्स मोठ्या शिकस्तीने इंच इंच पुढे सरकत होते–फिल्मिंग करणे अत्यंत जिकिरीचे काम होते, गोळ्यांचा मारा चुकविण्यासाठी सोल्जर्स जेव्हा खाली पडायचे तेव्हा मला उभे राहून त्यांची फिल्म घ्यावी लागायची–ते पळायचे तेव्हा मला स्थिर रहावे लागायचे. त्यांच्या actions च्या उलट सर्व actions मला कराव्या लागायच्या. ते trained soldiers–आणि मी लढाई म्हणजे काय, हे प्रथम अनुभवणारा कॅमेरामन. मी मोका मिळेल तेव्हा दहा सेकंद, पंधरा सेकंद लाइट ऑन् करून समोर घडणाऱ्या प्रसंगाची फिल्म घेत होतो. लाइट ऑन् झाला की आमच्या बाजूने गोळ्यांचा पाऊस पडायचा, सोल्जर्स मला आणि लिन्हला शिव्या घालायचे–पण माझे मन घट्ट झाले होते. मी डरणार नव्हतो. अनेक गोष्टी चित्रित करीत मी हळूहळू पुढे चाललो होतो. मशीनगनच्या फैरी झाडीत वेगाने पुढे धावणारे सोल्जर्स; हँडग्रेनेडसचा मारा करणारे; जखमी, विव्हळणारे सोल्जर्स; त्यांना स्ट्रेचरवर घालून नेणारे मेडिकस्; मेलेले सोल्जरस्–हात तुटलेले, कवटी फुटलेले, कोथळा बाहेर आलेले, चिंधड्या झालेले; आग ओकणाऱ्या टँकस्...जे जे दिसेल ते ते शांतपणे चित्रित करीत मी पुढे चाललो होतो.

माणसामाणसांची तत्त्वावरून लढाई जुंपली होती. माणसाला खून चढला होता आणि मला नशा चढली होती.माझ्या करिअरची–daring TV cameraman reports from Saigon..माझी फिल्म युरोप गाजविणार ह्याची खात्री...आणि मी जिवावर उदार होऊन, ह्या नशेसाठी वाटेल तो धोका पत्करीत, माणसाचा मृत्यू माझ्या कॅमेराने टिपीत शांतपणे एकएक पाऊल पुढे टाकीत चाललो होतो. माझ्या मेव्हण्याच्या गावच्या जंगलात, हातात रायफल घेऊन, एखाद्या जनावराचा मागोवा मी ज्या शांतपणाने काढीत असे त्याच शांतपणाने हातात मुव्ही कॅमेरा घेऊन सायगॉनच्या लढाईत मी माणसाचा मृत्यू टिपीत होतो. 'जळता भिकू' चुकला होता...पण आताचा हा मोका मी चुकविणार नव्हतो. आजूबाजूला अनेक माणसे मृत्युमुखी पडत होती...त्यांचा मृत्यू चित्रित करून मी माझी करिअर करणार होतो. नाव कमावणार होतो. इतका मोठा मोका पुन्हा मिळणे शक्य नव्हते...आणि म्हणूनच माझे मन अविचल होते–माझा कॅमेरा 'स्टेडी' होता, फोकस shanp होता...Each for himself & each on his own..

–पहाटेच्या सुमारास सोल्जर्सनी पॅलेसच्या तटाला मोठे भगदाड पाडले. मोठ्याने आरोळ्या ठोकीत, बंदुका झाडीत त्यांच्या झुंडीच्या झुंडी आत शिरू लागल्या. तटाच्या भगदाडापाशी मला ओळखीचा चेहरा दिसला. कर्नल टॉन् थॉट डिन्ह–प्रेसिडेंट डियमचा Special Security officer–ह्याने बाजू बदलली होती, डियमचा विश्वासघात केला होता. मी माझा कॅमेरा कर्नल टॉन थॉट् डिन्ह्‌च्या चेहऱ्यावर रोखला. कर्नलच्या डोळ्यात खून चढलेला माझ्या लेन्सने टिपला...त्याचा cold आणि क्रूर चेहरा मी विसरणे शक्य नाही. I was watching a traitor in full action–and I wanted to cover his every action.

पॅलेसमध्ये हलकल्लोळ माजला. दोन्ही बाजूंचे सैनिक एकमेकांच्या अंगांशी भिडले... अमानुष कत्तलीला सुरुवात झाली. पहाटेच्या पहिल्या किरणांबरोबर पॅलेसवर शरणागतीचा सफेद झेंडा चढला. कर्नल टॉन थॉट डिन्ह आणि त्याचे सैनिक पॅलेसमध्ये घुसले–पॅलेस गार्डसनी हातातली शस्त्रे टाकून जमिनीवर लोटांगण घातले. त्यांना तुडवीत, लाथा घालीत विजयी सैन्य आत घुसले. मी पण त्यांच्याबरोबर आत शिरलो! सर्वांचा रोख प्रेसिडेंटच्या खोलीवर. खून चढलेली ही माणसें प्रेसिडेंट डियमला जेव्हा पकडणार तो क्षण माझ्या दृष्टीने फार महत्त्वाचा होता–ते coverage चुकले तर मला फार फार वाईट वाटणार होते. मी टॉन थॉट डिन्हची पाठ सोडली नाही...

...सगळा पॅलेस धुंडाळून झाला, पण प्रेसिडेंट डियम् आणि त्याचा भाऊ न्हू हाती लागले नाहीत. सैनिक चिडले. त्यांनी पॅलेसमध्ये नासधूस आरंभिली. पडदे फाडले, फर्निचर मोडले, काचा फोडल्या, प्रेसिडेंटचे मोठे तैलचित्र फाडून त्याच्या चिंधड्या केल्या. मी प्रेसिडेंटच्या खोलीत शिरलो आणि त्या रिकाम्या खोलीचे चित्रीकरण करायला सुरुवात केली. त्याची खुर्ची, त्याचे टेबल, टेबलावरचा फोन–त्याचा लोंबकळणारा रिसिव्हर. सगळे डिटेलस् मी फिल्म केले. नऊच्या सुमारास माझ्याजवळची पंधराशे फूट फिल्म संपली! मी आणि लिन्ह हॉटेलवर परतलो. – सगळी exposed film मी सूटकेसमध्ये बंद केली, हजार फूट fresh फिल्म बरोबर घेऊन मी बाहेर पडलो.

संपूर्ण चोवीस तास कॅमेऱ्याला विश्रांती मिळाली नाही. डियम आणि न्हू ह्यांचा खून झाला. डॉन व्हॉन मिन्ह नवा प्रेसिडेंट झाला. टॉन थॉट डिन्हने प्रेस conference मध्ये सांगितले. Diem's death was an Accidental Suicide."

सायगॉनच्या रस्त्यामधून अनेक मिरवणुका निघाल्या. जाळपोळ झाली. लुटालूट झाली. संध्याकाळी अतिशय थकून मी एका बारमध्ये शिरलो – एक थंड बियर पिऊन हॉटेलवर परतायचे ठरविले; पण बारमध्ये भलताच प्रकार चालला होता. सायगॉनची तरुण पोरे आणि पोरी दारूने झिंगून बेभानपणे नाचत होती. टेबलावर, बार

काउंटरवर त्यांचे बेहोष नृत्य चालले होते. मी कॅमेरा त्यांच्याला लावला. लिन्टने लाइट ऑन् केला आणि मी तो उन्मत्त नाच फिल्म करू लागलो.

डियेमच्या राजवटीच्या अखेरीची ही फिल्म युरोपियन टेलिव्हिजनवर सुरू झाली ती ह्या तरुण पोरांच्या बेभान नृत्याने. डियमची कॅथलिक राजवट संपली होती. फिल्म फार गाजली. मला प्रमोशन मिळाले. डियमच्या मृत्यूने माझ्या करिअरची खरी सुरुवात झाली.

१९६३ डिसेंबर ते १९६६ जूनपर्यंत व्हिएतनाममध्ये माणसाला मरताना पाहिले, अनेक प्रकारची मरणे पाहिली, अनुभविली आणि चित्रित केली. माणूस माणसाची शिकार करतो तेव्हाचे तंत्र फार भयंकर आहे! ही 'शिकार' मला फार जवळून पहाता आली. विलक्षण अनुभव आले, रक्त गोठविणारे, रक्त तापविणारे...भावनाशून्य बनविणारे! माणसाची अनेक रूपे पाहिली, देवमाणसापासून-नराधमापर्यंत! माणसाला रडताना, हसताना, क्रोधाने पेटलेला, मृत्यूने घाबरलेला, वासनेने भडकलेला, उन्मादाने बेहोष झालेला, भीतीने वेडा झालेला, विजयश्रीने झिंगलेला...सुखावलेला, दुखावलेला, हरवलेला ...अशा अनेक अवस्थांतून जाताना पाहिले. स्वतःपण अनेक वेळा ह्या भावना अनुभविल्या. वेडा झालो, हरवलो, रडलो, हसलो, घाबरलो, झिंगलो...वासनेने बेहोष झालो, खिन्न झालो, सुन्न झालो. ह्या व्हिएतनाममध्ये अनेक वेळा मनाचे असंख्य तुकडे झाले ... पुन्हा ते जोडून कसाबसा उभा राहिलो ... पुन्हा फुटलो. अनेक वेळा असह्य वेदना सहन केल्या आणि ह्या सर्वांतून जात असताना करीअरच्या नशेसाठी कशाकशाची पर्वा केली नाही. वेड्यासारखे आघात सहन केले–नाव कमविले. कमाविलेल्या नावाची आणखी नशा चढली आणि मी बेदरकार बनत चाललो.

व्हिएतनाममध्ये मी स्वतःच्या मनाच्या चिंधड्या होऊ दिल्या. तेव्हा पर्वा केली नाही; पण आज प्रत्येक जखम ठणकते, ठिबकते. व्हिएतनामने माझ्यातला माणूस मारला...त्याला पुन्हा जिवंत करणाच्या सतत धडपडीत मी सध्या आहे.

जेव्हा जेव्हा व्हिएतनामचे विचार मनात येतात तेव्हा तेव्हा मन सुन्न होते. I wish I was never in Vietnam.

□

---

# लिली



....प्रेसिडेंट डियम् आणि मॅडॅम न्हू ह्यांची राजवट संपली आणि सायगॉन बघता बघता बदलले. सायगॉनचे सुवासिक रस्ते दुर्गंधीने भरले. काळा बाजार, अफू, गांजा, वेश्याव्यवसाय ह्यांची बेसुमार वाढ झाली. कोपऱ्याकोपऱ्यावर बारस आणि नाइट क्लबस् उगवले. सभ्य स्त्रियांनी दिवेलागणीनंतर रस्त्यावरून फिरण्याचे बंद केले.

सायगॉनच्या राजकीय परिस्थितीवर दुसरी फिल्म बनविण्यासाठी मी व्हिएतनाममध्ये आलो. अजून बॅचलरच होतो.

दिवसाचे काम आटोपून संध्याकाळी ताजातवाना होऊन बाहेर पडलो. 'ट्यू डो' रस्ता गजबजला होता.तरुण अमेरिकन सोल्जर्स टोळक्या-टोळक्यांनी रात्रीची सोबतीण हुडकत भटकत होते. 'मिस्टर हे मिस्टर, वॉट चायनीज़ व्हर्जिन. फ्रेंच, अमेरिकन, इंग्लिश ...ब्युटीफुल व्हर्जिन' असा सवाल करणारे अनेक रिक्षावाले कोपऱ्या-कोपऱ्यावर भेटले. त्यांच्याशी हास्यविनोद करीत मी स्पोर्टिंग बारच्या दिशेने निघालो. इतके अमेरिकन सोल्जर्स गल्लीगल्ली भटकत असताना व्हिएतनाममधली कुठलीही वयात आलेली पोरगी फार काळ 'व्हर्जिन' रहाणे कठीण होते.

रस्त्यामध्ये चेहरा रंगविलेल्या अनेक पोरी भेटल्या. अनेक जणींनी 'हाय' म्हणून इशारा केला. रुंद हसत, 'हायऽऽ' म्हणून प्रत्युत्तर देत मी पावले उचलली – स्पोर्टिंग बारच्या दिशेने रस्त्यावरच्या दुर्गंधीमध्ये ह्या तरुण पोरींनी वापरलेल्या उग्र अत्तराचा आणि घामाचा वास मिसळून एक विचित्र दर्प निर्माण झाला होता! उकिरड्यावर अत्तर शिंपडावे तसा अंगात भिनणारा there was something very strong and intensly human about this odour.

स्पोर्टिंग बारमध्ये शिरलो आणि अंधाऱ्या कोपऱ्यातील एका टेबलापाशी जाऊन बसलो. माझी ठरलेली जागा. काही क्षणातच माझी नेहमीची कमलनयना बियर घेऊन आली. माझे ठरलेले ड्रिंक आणि नेहमीप्रमाणे काळचाभोर लांब केसाची ती सुहास्यवदना माझ्या बाजूला बसली – अगदी जवळ. तिचे नाव लिली.

लिलीबरोबर बडबड करीत चिक्कार

बियर प्यालो– Lily wanted to go out with me and have dinner at an expensive night club. लिलीला बाहेरच्या बाहेर काढण्याची किंमत तीस डॉलर्स ममासानला – बारची ल्ठ्ठ मालकीणबाई– तीस डॉलर्स दिले (रुपये दोनशे पंचवीस) आणि लिलीच्या हातात हात गुंफवून बाहेर पडलो.

प्रथम लिलीच्या घरी जायचे ठरले. तिला अंघोळ करून कपडे बदलायचे होते. अंधाऱ्या गल्लीबोळातून वळणे घेत टॅक्सी एका दुमजली इमारतीपाशी थांबली. अंधाऱ्या जिन्यातून लिलीच्या पाठोपाठ वर गेलो. पॅसेजच्या टोकाला लिलीचा फ्लॅट होता. सेल्फ कन्टेन्ड. अॅटॅच बाथ अॅंड ए स्मॉल किचन. एका तरुण आणि देखण्या वेश्येच्या खोलीत पाय ठेवण्याची माझी पहिलीच वेळ. मी किंचित नर्व्हस आणि काहीसा एक्सा-इटेड्.

It was a attractive sitting cum bedroom. Decorated with good taste. The delicate female touth was everywhere. फिकट निळ्या भिंती फिकट निळा सोफासेटचे पांढऱ्या शुभ्र, केसाळ कार्पेटवर काळेभोर शिसवी टिपॉय हस्तिदंती नक्षीकाम केलेले, लाल, गुलाबी मंद प्रकाश देणारा टेबललॅंप, फिकट निळे कव्हर घातलेले डब्बलबेड – त्या शेजारी अनेक परफ्युमस्, लिपस्टिकस् इत्यादी सौंदर्यप्रसाधनांनी सजवलेले ड्रेसिंग टेबल, पलंगावर झोपले तर आरशात पहाता यावे अशा अॅंगलने ठेवलेले, पलंगाजवळच्या भिंतीवर एकच भलेमोठे तैलचित्र, उन्मादक अर्धनग्न तरुणीचे. लिलीने टेपरेकॉर्डरचे बटन दाबले, खोली धुंद स्वरांनी भारावली.

तिने माझ्या समोर दोन ग्लासेस, बर्फ आणि व्हिस्कीची बाटली ठेवली. मी दोन्ही ग्लासमध्ये व्हिस्की ओतली – बर्फाचे तुकडे टाकले आणि Cheers म्हणत ग्लास ओठाला लावला. थंडगार व्हिस्की घसा जाळीत रक्तात मिसळली – कपाळावर घामाचे थेंब उमटले. मी सिगरेट पेटविली. हात किंचित थरथरत होता. मी एक लांबलचक झुरका घेतला आणि लिलीच्या चेहऱ्यावर धूर सोडला. तिने मला डोळा घातला, दोन घोटात ग्लास रिकामा करीत, माझ्या गालांना स्पर्श करीत ती उठली, म्हणाली – 'तू व्हिस्की घे ! मी पाच मिनिटात अंघोळ उरकते; मग आपण निघू या...'बोलता बोलता तिने हात पाठीशी नेऊन झिप् खोलली, नागिणीसारखी कंबर हलवीत अंगातला स्किनटाइट ड्रेस उतरवून पलंगावर फेकला. क्षणभर आरशासमोर उभे राहून आपले शरीर न्याहाळले आणि चटचट पावले टाकीत ती बाथरूममध्ये शिरली. टेबललॅंपच्या लालसर गुलाबी प्रकाशाने पेटवलेले ते दुधाळ, मखमली मुलायम तारुण्याने मुसमुसलेले शरीर पाहून माझे रक्त सळसळून तापले. मी ग्लास रिकामा केला. पुन्हा भरला.

बाथरूमच्या उघड्या दरवाजातून पाण्याच्या तरंगात मिसळलेले लिलीचे गुण-गुणणे ऐकू येत होते. हातामध्ये व्हिस्कीचा ग्लास सावरीत, अस्थिर पावले टाकीत मी बाथरूमच्या दरवाज्यात उभा राहिलो. गरम पाण्याने भरलेल्या पिंक् टबमध्ये लिली डोळे मिटून, सैल अंगाने विसावली होती. लांब-सडक काळेभोर केस तिने टॉवेलच्या पिळचात गुंडाळून डोक्यावर बांधले होते. संपूर्ण नग्न स्त्री मी प्रथम पहात होतो. लिली अतिशय सुंदर होती. मी हलक्या आवाजात तिला हाक मारली. तिने डोळे उघडले, खोटचा रागाने मोठे केले, एका हाताने उभार स्तन झाकण्याचा प्रयत्न करीत लाजऱ्या आवाजात म्हणाली– 'तू बाहेर हो आधी– go listen to the music and finish your whisky–' मी जागचा हललो नाही. लिलीच्या देहावर खिळलेली नजर हलली नाही.

तिने शांतपणे अंघोळ संपविली. टॉवेलने अंग कोरडे केले आणि छातीभोवती टॉवेल गुंडाळून ती माझ्यासमोर उभी राहिली. मी वाट अडवून उभा होतो. तिच्या टवटवीत सुगंधाने, शरीराच्या उष्णतेने मला तापविले. माझा हात तिच्या छातीभोवती गुंडाळलेल्या टॉवेलकडे गेला– ती चपळाईने बाजूला झाली– तिरक्या नजरेने माझ्याकडे पहात, खालचा ओठ पुढे काढीत लाडिक समजा-वणीच्या स्वरात म्हणाली– 'आता नको... जेवणानंतर... O. K. ? –मी वाट मोकळी केली.

ड्रेसिंगटेबलाच्या आरशासमोर बसून ती स्वतःला सजवू लागली– मी ग्लास पुन्हा भरला आणि तरंगत्या डोक्याने तिचे सौंदर्य-प्रसाधन पहात सोफ्यावर बसून राहिलो.

– दरवाज्यात किल्ली फिरल्याचा आवाज आला– पाठोपाठ एक म्हातारी, पाच–सहा वर्षांच्या बसक्या नाकाच्या मुलाला घेऊन आत आली.

'व्हि. जे.– हा डॉंग्– माझा लाडका मुलगा–' लिलीने सांगितले आणि आपल्या पोराला जवळ घेत, त्याची पापी घेऊन म्हणाली– 'darling say hallo to. V. J.' बावरलेल्या डोळ्यांचे ते पोर, आज्ञाधारकपणे हात पुढे करून शेकहॅंड करण्यासाठी माझ्या-कडे आले. म्हातारी भिंतीला टेकून शांतपणे उभी होती. कोरडी ठणठणीत ! मला कसेसेच झाले.

एक अर्धनग्न तरुणी सौंदर्यप्रसाधनात गुंगली होती. तिच्यासमोर एक दारूने झिंगलेला अज्ञात तरुण, वखवखलेल्या नजरेने तिच्या लुसलुशीत शरीराचे लचके तोडीत आधाशासारखा बसलेला होता. कोपऱ्यातल्या खुर्चीत पाच–सहा वर्षांचे एक निर्जीव डोळ्यांचे, अबोल चेहऱ्याचे पोर– एकदा आईकडे आणि एकदा त्या तरुणाकडे पहात निमूटपणे बसून होते. म्हातारी भिंतीला टेकून उभी होती– शांतपणे. आपली नागडी-उघडी आई स्वतःला परक्या पुरुषासमोर सजवीत असलेले ह्या पोराने रोज बघितले असणार. अनेक मदांध आणि वखवखलेल्या तरुणांना, मी बसलो होतो त्याच ठिकाणी बसलेले पाहिले असणार. रोज नवीन चेहरा– पण वखवख तीच !

तापलेल्या रक्ताची सळसळ हळूहळू कमी होऊ लागली. व्हिस्की डोक्याला चढली. लिली तयार झाली– तलम फिकट पिवळ्या रंगाचा ड्रेस. खूप मादक दिसत होती. पोराला बाय् बाय् करून आम्ही बाहेर पडलो– हातात हात गुंतवून, अंगाला अंग घाशीत !

...लवचिक अंगाची एक कोरियन तरुणी स्तन हिंदकाळीत, नितंब उडवीत अंगावरचा एकएक कपडा उतरवीत होती. संगीताच्या तालात शरीराला उन्मादक झटके देत ऑडियन्सला पद्धतशीरपणे पेटवीत होती. मी लिलीचा हात हातात धरून शॅंपेनने झिंगत, स्टेजवरचे उसळणारे तारुण्य पीत होतो. शून्य मनाने, अंधुक नजरेने, मेलेल्या वासनेने. शॅंपेनचा अंमल चढत होता– पण समोरचा

पेटीव नाच, लिलीचा सहवास– काही तासां· पूर्वी पिंक टबमध्ये पाहिलेल्या दुधाळ स्वप्नाची स्मृती– वाढती लय, ह्या कशानेही एकदा भडकून विझलेली आग पुन्हा पेट घेत नव्हती. जाणीव नष्ट होत चालली होती... मी आणखीन शँपेन मागविली.' मी एक मिनिटात आले–' म्हणत माझ्या बधिर बोटातून आपला हात सोडवून घेत लिली उठली आणि बाथरूमच्या दिशेने नाहीशी झाली.

सुन्न मनाने मी शँपेन संपवीत बसून होतो. तास लोटला तरी लिली परतली नाही. पंचाहत्तर डॉलर बिल भरून मी उठलो. तोल सावरीत बाहेर आलो. हॉटेल गाठले आणि बिछान्यात पडलो. पिंक टबमधील लुसलुशीत लिली आठवण्याचा प्रयत्न केला; पण बधिर झालेल्या मनाला ते चित्र रेखाटता येईना... काही काही आठवेना !

---

# मिनंग कबाव : जावा आणि सुमात्रा

आज सुमात्रामधला शेवटचा दिवस. संध्याकाळी गव्हर्नरच्या बंगल्यावर farewell dinner.

पश्चिम सुमात्राने काही आंतरराष्ट्रीय संस्थांच्या मदतीने आपली संपूर्ण शिक्षणपद्धती बदलण्याचा प्लॅन आखला होता. नेहमीच्या traditional education मुळे फक्त clerk मंडळी तयार होतात. सर्व एशियाचा हा प्रॉब्लेम आहे. एशियाभर कारकून लोकांची भरमसाट वाढ होत आहे. प्रत्येक जण डिग्री घेतो आणि कारकुनी करण्यासाठी धडपडतो. अंगमेहनतीचा दर्जा खालावत चालला आहे. पश्चिम सुमात्राला हे सर्व बदलायचे आहे–they are planning to have an educational system that is directly related to the resources and problems of their province. इंडोनेशियामधला पश्चिम सुमात्रा हा एक अतिशय समृद्ध प्रदेश आहे. It 's enormous national resources are not yet fully exploited. They have Oil, Rubber, Timber, Coal, Cinchona, Cloves, Copra, Tin and much more.

पश्चिम सुमात्राचा सर्वांत मोठा problem out megration सगळे तरुण डिग्री घेतल्यानंतर जकार्ताला जाण्याच्या धडपडीत असतात. सुमात्राच्या खेड्यापाड्यांत म्हातारी माणसे आणि अविवाहित तरुण मुली ह्यांचे प्रमाण दिवसेन्दिवस वाढत चाललेय. ह्या Outmigration च्या मागचे सर्वांत महत्त्वाचे कारण म्हणजे पश्चिम सुमात्रामधली मातृसत्ताक पद्धती आणि 'आदत्' आदत्. म्हणजे रूढी – आणि ही रूढी त्यांच्या इस्लामधर्मापेक्षा जास्त भिनलेली आहे. घरामध्ये पुरुषापेक्षा स्त्रीला जास्त महत्त्व. अविवाहित तरुण मुलाला संध्याकाळी घरात रहायला मनाई. झोपण्यासाठी त्याने मशिदीत गेले पाहिजे. सकाळी उठून दिवसभरच्या कामासाठी त्याने घराकडे यायचे. मिळकतीवर मुलाला हक्क नाही. कशावरच त्याला मालकी हक्क सांगता येतनाही. अविवाहित तरुणाच्या मिळकतीवर त्याच्या बहिणीचा हक्क. घरामधे वडिलांपेक्षा आईचा भाऊ श्रेष्ठ. मामाचा अधिकार सर्वांत मोठा ! लग्न झाल्यावर मुलाला मुलीच्या घरी रहाण्यास जावे लागते. तिथे त्याला जावई वगैरे न मानता, खूप दिवस रहायला आलेल्या पाहुण्यासारखे वागविले जाते. घरातल्या धुळीपेक्षा थोडासा अधिक मान ! नवऱ्याला दिवसभर घर बंद. त्याने फक्त रात्री झोपण्यापुरते घरी यायचे.

– ह्या असल्या रूढीला आजकालची तरुण मुले कंटाळलेली आहेत. पश्चिम सुमात्राचा तरुण इकडच्या तरुणीशी लग्न करायला तयार नाही. जकार्ताला जाऊन दुसऱ्या एखाद्या जाव्हा किंवा कालीमानतान् प्रदेशातल्या मुलीशी लग्न करणे त्याला जास्त सोयीचे आहे. प्रत्येक तरुण पश्चिम सुमात्रातून बाहेर पडण्याच्या खटपटीत आहे.

– ह्या तरुणांना इंडोनेशियात इतरत्र नोकऱ्यादेखील ताबडतोब मिळतात. इतर इंडोनेशियन लोकांच्यापेक्षा पश्चिम सुमात्राचे लोक जास्त तल्लख बुद्धीचे अशी त्यांची ख्याती आहे. बहुतांशी ते खरे पण आहे. पश्चिम सुमात्राचे लोक 'मिनंग्कबाव' ह्या नावाने ओळखले जातात. कानाला गोड लागणाऱ्या ह्या शब्दाचा अर्थ 'आमचा रेडा जिंकला' असा आहे. मजेशीर कथा आहे.

फार पूर्वी जाव्हा ( जावा ) प्रदेशाचा एक बलाढ्य राजा मोठ्या सैन्यानिशी पश्चिम सुमात्रावर चाल करून आला. पश्चिम सुमात्राच्या राजाने त्याला निरोप

घाडला की लढाई करून सुमात्रा काबीज करण्याच्या प्रयत्नात निष्कारण दोन्ही बाजूंचे अनेक सैनिक मरण पावतील – त्यापेक्षा रेड्यांची झुंज लावून निर्णय ठरविलेला बरा! तुमचा रेडा जिंकला तर पश्चिम सुमात्राचे सर्व राज्य मी तुमच्या स्वाधीन करीन – पण जर आमचा रेडा जिंकला तर तुम्हाला आल्या पावली परत जावे लागेल! जाव्हाच्या राजाने अट मान्य केली. झुंजीचा दिवस ठरविला. जाव्हाहून एक बलाढ्य रेडा मागविला आणि त्याला माजवून झुंजीसाठी तयार केला.

– मैदान लोकांनी भरलेले. जाव्हाचा तो मस्तवाल रेडा बघून तोच जिंकणार अशी अनेकांची खात्री पटली. पश्चिम सुमात्राचा रेडा मात्र कुठेच दिसत नव्हता – लोक काळजीत पडलेले. झुंजीची वेळ झाली – दोन्ही राजांनी इशारा केला. जाव्हाचा रेडा मैदानात आला – डरकाळ्या फोडीत, लाल डोळ्यांनी मुसंड्या मारीत, शिगांनी आणि खुरांनी माती उधळीत. दुसऱ्या बाजूने पश्चिम सुमात्राचा प्रतिस्पर्धी मैदानात आला – एक हडकुळे, मरतुकडे रेडकू – तीन – चार महिन्यांचे! जाव्हाचे लोक पोट धरधरून हसले... सुमात्राचे लोक काळजीत पडले. जाव्हाचा बलाढ्य रेडा ह्या रेडकाचा क्षणार्धात चेंदामेंदा करणार आणि सुमात्राचे राज्य जाव्हाच्या राजाच्या हातात पडणार अशी सर्वांची खात्री पटली; पण वेगळाच प्रकार घडला!...

त्या मरतुकड्या रेडकाने एकवार रेड्याच्या दिशेने नाक वर करून हुंगले आणि व्हॅंक् व्हॅंक् असा आवाज काढीत चौखूर उधळत ते रेड्याला जाऊन भिडले – त्याच्या पाठीमागील दोन पायांत डोके खुपसून ढुश्या देऊ लागले – गोंधळलेल्या रेड्याला नाजूक जागी असंख्य इंगळ्या डसल्यासारख्या वेदना झाल्या. तो बलाढ्य रेडा गोल गोल फिरत त्या रेडकाच्या तावडीतून सुटण्याचा प्रयत्न करू लागला; पण रेडकू सोडीना! रेड्याच्या दोन पायांत डोके घुसळीत, व्हॅंक् व्हॅंक् करीत ते ढुश्या देत राहिले. प्रत्येक ढुशीबरोबर रेड्याच्या मांड्यांमधून रक्ताच्या चिळकांड्या उडत होत्या. वेदनेने कासावीस झालेल्या रेड्याने कशीबशी त्या रेडकाच्या तावडीतून सुटका करून घेतली आणि शेपूट उंचावून मैदानातून धूम ठोकली!..रेडकू व्हॅंक् व्हॅंक् करीत त्याच्या मागे ... सुमात्राच्या लोकांनी जयघोष केला 'मी नंग-कारावाव ...' 'मी नंग् कारावाव' – 'आमचा रेडा जिंकला!' आश्चर्याने स्तिमीत झालेला जाव्हाचा राजा पराभव पत्करून मुकाट्याने परतला!

पश्चिम सुमात्राच्या बुद्धिमान राजाने झुंजीसाठी एका नुकत्याच जन्मलेल्या रेडकाची मुद्दामच निवड केली होती. दुधावर वाढणाऱ्या ह्या रेडकाला त्याने झुंजीअगोदर तीन दिवस उपाशी ठेवले होते. झुंजीच्या दिवशी रेडकाच्या कपाळाला एक अणकुचीदार खिळ्यांची पट्टी बांधून त्याला मैदानात सोडले होते. रेड्याला पहाताच ते भुकेलेले रेडकू दूध पिण्यासाठी म्हणून त्याच्याकडे धावत गेले. त्याच्या मागील पायात डोके खुपसून दूध पिण्यासाठी ढुश्या देऊ लागले. रेडकाच्या प्रत्येक ढुशीबरोबर रेड्याच्या नाजूक जागी अणकुचीदार खिळे रुतून त्याला असह्य वेदना होऊ लागल्या. रक्ताच्या धारा लागल्या आणि तो बलाढ्य रेडा गोंधळून मैदान सोडून पळून गेला! पश्चिम सुमात्राचे स्वातंत्र्य अबाधित राहिले आणि लोकांनी जयघोष केला 'मी नंग्-काराबाव!' तेव्हापासून ह्या लोकांना 'मिनंग-कबाव' हे नाव पडले. रेड्याची शिंगे हा त्यांचा national emblem झाला, आजही हा symbol सर्वत्र पहायला मिळतो. घराच्या छपरांना शिंगासारखी टोके काढलेली असतात. डोक्याला उपरणे बांधतात ते पण शिंगासारखे – दोन टोके काढून! □

# माणूस : एक सर्वभक्षी प्राणी

मनुष्य हा महाभयानक प्राणी आहे. तो वाटेल तसा वागतो. वाटेल ते बोलतो. वाटेल ते करतो आणि वाटेल ते खातो.

मी उंट खाल्ला आहे. घोडा खाल्ला आहे. साप, कासव, बेडूक, खार, चिमणी आणि कुत्रासुद्धा खाल्ला आहे. मनुष्य एकदा मांसभक्षण करायला लागला की, त्याच्या जिभेला हाड उरत नाही. सर्व प्राण्यांत माणसाइतकी महाभयानक जात नाही! माणूस माणसाला तर खातोच–पण इतर सर्व जिवंत प्राण्यांना देखील तो खातो.

कोंबडी, बोकड, मेंढी, मासळी, गाय, म्हैस, डुक्कर हे नेहमीच्या जेवणातले. बहुतेक सर्व माणसे हे मांस खातात. हिंदू गायीचे मांस खात नाही, मुसलमान डुकराचे मांस खात नाही हे minor details. ह्याशिवाय इतर मान्य असलेले मांस ससा, हरीण, सांबर, भेकर इत्यादी वन्य श्वापदांचे आणि तित्तिर, कबुतर, कवडे, बदक इत्यादी पक्ष्यांचे. पाळीव प्राण्यांपैकी उंट, घोडा आणि कुत्रा ह्यांचे मांस अनेक ठिकाणी खाल्ले जाते. माझा पहिला कुत्रा मी दक्षिण व्हिएतनाममध्ये खाल्ला–it is considered a delicacy in that part of the world. बरा लागला. कंबोडियाच्या एका खेड्यात मी

घोड्याचे कबाब खाल्ले आणि अफगाणिस्तानमध्ये उंट खाल्ला !

पक्ष्यांपैकी चिमणी, घार, घुबड, बगळा, पिंगळा, ससाणा ह्यांचे मांस आवडीने खाताना मी अनेकांना पाहिले आहे. वटवाघूळ तर लोकांचे अत्यंत आवडीचे खाद्य–मी वटवाघूळ खाल्ले आहे. मला तितकेसे आवडले नाही.

काही लोक जिवंत नाकतोडे आणि टोळ कचाकचा चावून खातात ! माझ्यात तेवढे धैर्य नाही. झुरळ, पाली, सरडे, साप हे देखील अनेकांचे आवडीचे पदार्थ आहेत. मी झुरळाची चटणी चाखली आहे आणि एक आख्खा साप खाल्ला आहे–हाँगकाँगमध्ये ! मनुष्यप्राणी काय खाईल याचा नेम नाही !

माझ्या भटकंतीच्या आयुष्यात मी एक नियम पाळला–माझ्या बाजूचा मनुष्य जे खात असेल ते एकदा तरी खाऊन बघायचे. अनेक पदार्थांच्या बाबतीत मी हा नियम फक्त एकदाच पाळला–पुन्हा खाणे माझ्याच्याने जमले नाही.

हाँगकाँगमध्ये एका संध्याकाळी भटकत भटकत मी एका छोट्याशा चायनीज हॉटेलात शिरलो. एक बियर मागविली आणि रस्त्यावरची गर्दी पाहात बसून राहिलो. माझ्या बाजूला एक मध्यम वयाचा चायनीज येऊन बसला–खूप दमलेला दिसत होता. हॉटेलच्या मालकाला त्याने Order दिली. मालक आतल्या खोलीतून तीन-चार वळवळणारे साप हातात धरून आला. माझ्या बाजूच्या गिऱ्हाइकाने त्यातला पिवळ्या रंगाचा, हिरव्या पट्ट्यांचा एक साप निवडला. I got interested. मालकाने सापाचे शेपूट पायाच्या अंगठ्यात पकडले–डाव्या हातात तोंड धरून साप ताणला, ब्लेडने डोक्यापासून शेपटीपर्यंत चिरला, एका हिसड्यात केळे सोलावे तसा साप सोलला, कातडे टोपलीत फेकले. त्याच्या हातात वळवळणारा 'पांढरा' साप–बिगर कातडीचा. त्या सापाचे पोट त्याने चिरले. पोटातून एक छोटीशी काळी 'पिशवी' काढली. एका ग्लासमध्ये ती टाकली–त्याच्यावर तांदळाची दारू ओतली–चमच्याने 'पिशवी' ठेचून त्यातून निघणारा काळानिळा रस दारूत मिसळला, ग्लास गिऱ्हाइकाला दिला. गिऱ्हाइकाने ग्लास तोंडाला लावला आणि एका घोटात रिता करून मोठ्याने ढेकर दिला. तोपर्यंत मालकाने वळवळणाऱ्या बिगर कातडीच्या सापाच्या खांडोळ्या केल्या, तांदळाच्या पिठात भिजवून शेवग्याच्या शेंगांच्या भज्यांप्रमाणे तळल्या आणि गिऱ्हाइकासमोर आणून ठेवल्या. मला राहवेना. मी मालकाला बोलावले आणि खुणेने मला पण साप हवा असल्याचे सांगितले. सोनेरी दात दाखवीत मालक हसला. आतून त्याने पाच-सहा साप आणले. मी पण एक पिवळा, हिरव्या पट्ट्यांचा साप पसंत केला.

काळीनिळी 'पिशवी' ठेचून मिसळलेली तांदळाची दारू एका घोटात प्यालो. सापाच्या खांडोळ्या शेवग्याच्या शेंगांप्रमाणे चावून चावून, चावून चावून बियरच्या घोटाबरोबर गिळल्या. मोठा ढेकर दिला आणि तृप्त मनाने हॉटेलवर परतलो. रात्री झोप येईना. उठलो, बाथरूममध्ये गेलो–घशामध्ये बोटे घालून भडाभडा ओकलो–कोलगेटने तोंड साफ केले. लिस्टरिनच्या गुळण्या केल्या, तोंडाला old spice फासले आणि बिछान्यात येऊन पडलो. It was quite an experience.

मी एकेकदाच खाल्लेल्या आणि मला अजीबात न आवडलेल्या पदार्थांत थायलंडमधले 'शंभर वर्षांचे अंडे' आणि फिलिपिन्समधले young chick egg' हे दोन पदार्थ आहेत.

थायलंडचे हे कुजलेले अंडे महाभयानक आहे. हे शंभर वर्षांचे जुने नसले तरी दोन–तीन वर्षांचे नक्की असणार. हे बनविण्याचा खास तरिका आहे. बरीचशी कोंबडीची अंडी एका टोपलीत भरून, त्यावर घोड्याची लीद लिंपून जमिनीत गाडली जातात. दर दहा–पंधरा दिवसांनी त्यावर घोड्याची फ्रेश लीद थापली जाते आणि घोड्याचे मूत्र शिंपडले जाते. वर्ष–दोन वर्षांत ही अंडी चांगल्यापैकी कुजतात. मोठमोठ्या हॉटेल्समधून Hundred year old eggs म्हणून विकली जातात. They are expensive and considered a delicacy. मी असली दोन अंडी बँकॉकच्या एका प्रख्यात हॉटेलमध्ये खाल्ली. कवच फोडल्यानंतर जांभळे, हिरवे. निळे दिसणारे ते अंडे मी बियरच्या घोटाबरोबर घशाखाली उतरविले आणि पुन्हा त्या भानगडीत पडलो नाही ! थायलंडचे कुजके अंडे आपल्याला अजिबात आवडले नाही.

दुसरे अंडे फिलिपिनसमधले. हा फार भयंकर प्रकार आहे. अंडे दहा–पंधरा दिवस उबविल्यानंतर त्यातले पिल्लू चोच, नखे आणि पिसे ह्याशिवाय असते. असली दहा–बारा दिवस उबविलेली अंडी आतल्या कोवळ्या पिल्लांसकट उकडून काढायची. उकडलेल्या अंड्यावरचे कवच सोलायचे आणि शिजलेल्या पिल्लासकट ते कुडुम्-कुडुम करून खाऊन टाकायचे ! मी एक खाल्ले. दुसरे खाणे जमले नाही !

तिसरा प्रकार. गाभण डुकरिणीचे पोट फाडून तिच्या गर्भाशयातली कोवळी कोवळी पाच–सहा पोरे बाहेर काढली जातात. आपल्या तंदुरी कोंबडीप्रमाणे चांगली रोस्ट करून टेबलावर आणतात. प्रत्येकाने एक-एक सहा इंची डुकराचे पोर उचलायचे आणि सगळेच्या सगळे चावून खायचे–कोवळ्या, कुरकुरीत हाडांसकट !

प्रकार चौथा. 'कल्लेपाचे'–इराणमधले फेमस सूप. बोकडाच्या कवटीचे आणि पायांचे. चामडे सोललेली पण डोळे आणि दात शाबूत असलेली अख्खीच्या अख्खी कवटी एका मोठ्या खोलगट प्लेटमध्ये घालून तुमच्यासमोर ठेवतात. प्रथम त्या बोकडाच्या कवटीचे डोळे खायचे, बाजूचे सूप भुरकत भुरकत जीभ खायची आणि सर्वांत शेवटी मेंदू खायचा !

बैलाची आतडी, जीभ, शेपूट, काळीज, फुप्फुसे, जठर...काही काही म्हणून खायचे माणसाने सोडलेले नाही. असले अनेक प्रकार मी चाखले आहेत–अनेक वेळा हॉटेलच्या खोलीवर येऊन बाथरूममध्ये भडभडून ओकलोही आहे !

अरेबिया, इराण, अफगाणिस्तान ह्या देशांत काही ठराविक प्रसंगी एक खास मेजवानी दिली जाते असे मी ऐकले आहे–प्रत्यक्षात पहाण्याचा योग आला नाही; पण लवकरच येईल.

एक चांगलासारखा उंट मारून, साफ करून, त्याच्या पोटात एक मध्यम आकाराची साफ केलेली गाय भरायची. गायीच्या पोटात बोकड, बोकडाच्या पोटात कोंबडया आणि जिथे जिथे जागा उरली असेल तिथे भात, अंडी, बटाटे, कांदे, मनुका, बदाम, केशर इत्यादी मसाला भरून त्या उंटाचे पोट शिवायचे. मग हा भरलेला उंट

मातीने लिपायचा–मंद निस्तवावर खरपूस भाजून काढायचा–त्याच्या पोटातले सर्व प्राणी शिजेपर्यंत ! मग त्याच्यावरची माती खरवडून हा 'खरपूस उंट' एका ताडपत्रीवर ठेवायचा. शंभर-दीडशे माणसांनी त्याच्या भोवताली बैठक मारायची आणि हाताने लचके तोडीत प्रथम उंट खायचा, मग त्याच्या पोटातली गाय, मग बोकड, मग कोंबड्या–अशा क्रमाने सगळे फस्त करायचे. रात्रभर चालणारा मामला ! असला 'भरलेला उंट' खाण्याची जबरदस्त इच्छा आहे. असला उंट खाऊन झाला की, मग संपूर्ण शाकाहारी व्हायचे असा मी निश्चय केला आहे.

अळूची पातळ भाजी, मसाल्याचे वांगे, वरणभात हा शुद्ध सात्त्विक आहार. फारच झाले तर सोलाची कढी, वालाचे बिरडे, मसालेभात ही मेजवानी; पण सर्वांत उत्तम वांग्याचे खानदेशी भरीत, जोंधळ्याची कर्नाटकी भाकरी आणि महाराष्ट्राची काळ्या तिळाची चटणी–शुद्ध गोडेतेल घातलेली. मधल्या खाण्यासाठी मंद विस्तवावर भाजलेली कोवळी कणसे–तूप-मीठ लावलेली आणि अगदी जिवाची चैनच करायची झाली तर कच्च्या केळीची कापे, फणसाची भाजी, ओल्या काजूची आमटी, आंबेमोहर तांदळाचा भात, आमलीचे लोणचे आणि उडदाचे पापड ! वा: !–चिमण्या, कावळे आणि बैलाची आतडी खाण्यापेक्षा बरे...

◻

# नाइन अवर्स टू रामा

काही महिन्यांपूर्वीची एक आठवण. तेव्हा मुक्काम तेहरान. इराणची राजधानी. By the way Iran is not part of Middle-East इराण आशियाखंडामध्ये आहे. इराणच्या कुठल्याही शहरात टॅक्सीमध्ये बसताच, सिगारेट ऑफर करून टॅक्सीड्रायव्हर पहिला प्रश्न करतो–'तुम्ही हिंदी की पाकिस्तानी ?' 'हिंदी' हे उत्तर मिळताच प्रसन्न मुद्रेने म्हणतो, 'वाह् वाह्–उत्तम !' आणि मग क्षणार्धात गंभीर चेहऱ्यानं आणि समजावणीच्या सुरात स्वतःशीच बोलल्याप्रमाणे सांगतो 'आम्ही इराणी, तुम्ही हिंदी...आणि पाकिस्तानी...आपण सगळे भाऊ भाऊ–' जणू काही त्याला सुचवायचे असते 'तुम्ही हिंदी-पाकिस्तानी लोकांनी एकमेकांबरोबर झगडणे वेडेपणाचे आहे...'

–तर तेहरानमधील काही महिन्यांपूर्वीची एक आठवण. एका संध्याकाळची. दिवस हिवाळ्याचे. जाम बर्फ पडत होते. दारावरची घंटा वाजली.

'सलाम भाई जान !'

'सलाम...सलाम...आओ भाई अंदर आवो–' मी फते सिद्दीकीला आत घेतला. फते पाकिस्तानी-कराचीचा. वय २७।२८. कॉमर्स आणि अकौन्टन्सीची डिग्री. माझ्या हाताखाली अॅडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर म्हणून कामाला.

'विजयभय्या पहिले ए खावो...और इनको फ्रिज मे रख दो–' माझ्या हातात कराचीच्या पानांचे पुडके प्लास्टिकमध्ये गुंडाळलेले फते सिद्दीकीच्या आईने पाठविलेले !

फते पानांचा शौकीन. मी पण. परदेशांत पान मिळणे कठीण ! इराणमध्ये तर महामुष्किल ! इराणी लोक पान खात नाहीत. मध्यंतरी माझी आई काही महिन्यांसाठी तेहरानला आली होती. येताना हजार-पाचशे पाने तिने बरोबर आणली होती. तिची अट–'विज्या, पाने संपली की मी परत जाणार !' फते सिद्दीकीला हे कळले. 'माताजी आपको अगर पान मिलता रहेगा तो आप तेहरान नहीं छोडोगी ना–' प्रथम भेटीतच त्याने सवाल केला. आईचे उत्तर–'होय रे बाबा, तेव्हढीच एक सवय उरले–सोडायची आहे–पण खाल्ल्याबिगर चैन नही पडता !' फतेची तिला तडकाफडकी गॅरंटी–'फिर आप बिलकुल बेफिक्र रहियेगा–हर हप्ते ताजा पान आपके लिये कराचीसे

आयगा...म आजही घर चिठ्ठी भेजता हूँ–'

फते सिद्दीकी हा बोले तैसा चाले पैकी. आईचे एकदम 'लाडके बाळ' झाला! त्याला रोज आग्रहाने थालीपीठ, लसणीची चटणी, गरम गरम चपात्या, मसाल्याचे वांगे, श्रीखंड, गाजराचा हलवा असा खुराक सुरू झाला. फते दिवसेनदिवस गुटगुटीत! त्याला पोटभर जेऊ घालताना आई नेहमी म्हणत असे–'मेरा लडका भी पहले तुम्हारे जैसाच भरपूर खाता था–अभी डायट करताय–कूछ नही खाताय–ताक पिताय और कोशिंबीर–' फतेवर ह्या विधानाचा परिणाम शून्य! सोलाची कढी भुरकत एकाग्रतेने भोजनविधी पार पाडण्यात तो गुंग. माझ्या जन्माअगोदर आईचे सोवळेओवळे फार–मुसलमान शिपायाच्या हातचे पाणी तिला चालायचे नाही असे तीच सांगत असे. तीच आज पाकिस्तानी मुसलमानाला आपल्या मुलाप्रमाणे प्रेमाने जेवण करून घालीत होती. हा नुसताच कालमहिमा नव्हे. साठीच्या घरातील माझी आई इतक्या चटकन एका पाकिस्तानी मुसलमानाबरोबर emotionally intigrate कशी होऊ शकते, ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे.

तर आठवण तेहरानमधल्या एका बर्फाळ संध्याकाळची. फत्ते सिद्दीकीच्या आईने पाठविलेले कराचीच्या पानांचे पुडके मी फ्रिझमधे ठेवले. एक विडा तोंडात टाकला. घरी मी एकटाच होतो. आई, माझी बायको आणि मुली भारतात परतल्या होत्या. काही महिन्यांनंतर मी देखील परतणार होतो.

'विजयभय्या आज रात टीव्हीपे बडी फेमस मुव्ही है–'

'कौनसी?'

'गांधीजीका मर्डर...Nine Hours to Rama–आपने तो जरूर देखी होगी.'

'नही यार फते–मैने नही देखी...और साला टी व्ही भी मैने आज सुबही येच डाला है–यहाँ का टीव्ही हिंदुस्थान ले जाने में कोई फायदा नही!'

'क्या मुसीबत...'

'फते ऐसा करेंगे...आज शाम मुझे खलीलझादेने खानेके लिये बुलाया है...चल मेरे साथ...उधरही फिल्म देखलेंगे.'

रात्री आठ–साडेआठच्या सुमारास आम्ही दोघे खलीलझादेच्या घरी. हा इराणियन सोशल सायंटिस्ट. अत्यंत हुषार आणि निखळ सज्जन माणूस. दिलदार. अतिशय सेन्सेटिव्ह आणि मानवतावादी. खलीलझादे बॅचलर. तिशीचा. त्याच्या घरी त्याची म्हातारी आई आणि नवऱ्याने सोडलेली चाळिशीच्या घरातील बहीण. खलीलझादेचे पहिले नाव कासीम; पण मी त्याला खलील म्हणूनच हाक मारीत असे.

खलीलच्या घरी पोहचलो. 'सलाम–हाऽले शुभा चतोरेऽऽ' शेकहॅंडस्, मिठ्या आणि एकमेकांच्या पाप्या घेऊन पर्शियन गालिच्याने सजविलेल्या त्याच्या प्रशस्त दिवाणखान्यात आलो. ह्याला म्हणावे दिवाणखाना! खलीलच्या आईने आणि बहिणीने माझ्या आणि फतेच्या घरच्या मंडळींची सविस्तर चौकशी केली. इराणमधला हा एक रीतीरिवाज फार गोड आहे. त्यात थोडाफार औपचारिकपणा असला तरी एक खानदानी उब आहे. आपल्यातला खडबडीतपणा नाही. ही विचारपूस चालू असताना खलीलने आमच्यासमोर संत्री, सफरचंद, बदाम, पिस्ते, आक्रोड ह्यांनी भरलेली ताटे ठेवली. ताटेच–प्लेटस् नव्हे–the legendary Persian hospitality should be seen to be believed...

रात्री नऊ वाजता 'नाइन अवरस् टू रामा' ही फिल्म. खलीलने माझ्या आणि फतेच्या हातात व्हिस्कीचा ग्लास दिला. खाना फिल्मनंतर असे ठरले आणि आम्ही सर्व टीव्ही भोवती बसलो. खलील, त्याची म्हातारी आई, फते आणि मी–दिवाणखान्याच्या दरवाज्यात खलीलची वृद्ध स्वयंपाकीण. फिल्म सुरू होण्याअगोदर भरलेल्या आवाजात स्वयंपाकीणबाईचे मला उद्देशून कॉमेंट—

'गांदी आदम खैली खैली खूब...मिस्ले फरिश्ते...तुमची बायको हिंदुस्थानातून परत येणार तेव्हा गांधींचा एक रंगीत फोटो आणायला सांगा! मी माझा नवरा...आम्ही शिकलेली माणसे नाहीत...तुमच्यासारखी...पण घरात गांधींचा फोटो असावा असे आम्हाला फार वाटतं...खुदाचा मनुष्य...'

नाइन अवर्स टू रामा फिल्म सुरू झाली. खलीलच्या दिवाणखान्यात डेड सायलेन्स. सर्वांचे डोळे टीव्हीच्या एकवीस इंची काचेवर हिप्नोटाईझ झाल्याप्रमाणे खिळलेले. खलीलच्या कपाळावरची शीर तट्ट फुगलेली. त्याची बहीण हरवल्यासारखी. म्हाताऱ्या आईच्या डोळ्यात वारंवार पाणी...स्वयंपाकीण दरवाज्यात पुतळ्यासारखी न हलता. या फतेचा चेहरा अतिशय गंभीर. अस्वस्थ चुळबुळ फक्त माझीच. मी भारतीय आणि गांधी मर्डरवर आधारित फिल्म म्हणून नव्हे–तर Nine Hours to Rama is a rediculously cheap third-rate फिल्म म्हणून.

फिल्म फार्सी भाषेत 'डब' केलेली. मला फार्सी कळते – बऱ्यापैकी. एका इराणी सोशल सायंटिस्टच्या घरी, पाकिस्तानी मित्राबरोबर गांधी मर्डरवर आधारित Nine Hours to Rama नावाची भिक्कार फिल्म पहाण्याचा दुर्दैवी योग माझा मीच ओढवून घेतला होता. फिल्म एकदाची संपली. खलीलच्या दिवाणखान्यात तोच डेड सायलेन्स. थोड्या वेळाने मीच घसा खाकरला. खलीलने व्हिस्कीचे तीन ग्लास भरले – फतेने घाईने एक ऑकवर्ड घुटका घेतला. खलीलची आई दुखऱ्या गुडघ्यांना आधार देत, खुदाकडे गांधींच्या अमानुष हत्येबद्दल खेद आणि नाराजी व्यक्त करीत जेवणाची तयारी करण्यासाठी डायनिंग रूममध्ये गेली. तिच्या पाठोपाठ खलीलची बहीण आणि स्वयंपाकीणबाई तयारीला लागल्या. दिवाणखान्यात एकमेकांची नजर टाळीत आम्ही तीन (सावत्र!?) भाऊ उरलो–इराणी, पाकिस्तानी आणि भारतीय! जगभर गाजलेली फिल्म इतकी ढुक्कार कशी? या विचारात मी अडकलो होतो. फतेने शांततेचा भंग केला.

'—that bastard Nathuram–why did he do it? why? साला हरामी...' फते प्रचंड डिस्टर्बड्.

'...' माझा सायलेन्स

'...' खलील खोल विचारात गढलेला.

'विजयभय्या इसमे ... उन दिनोंमें जरूर कोई बाहर का हाथ होगा ... अंग्रेजी एजंटोकी ये चाल होगी–एक हिंदुस्थानी ऐसा काम कभी नहीं करेगा चाहे हिंदू ब्राह्मन् हो या पंजाबी... CIA का भी हाथ हो सकता है.' जवान पाकिस्तानी फते भावनावश होऊन गोंधळलेला–बंगलादेश नंतर बहुतेक पाकिस्तानी माणसांना CIA च्या

विचाराने जबरदस्त पछाडलेले. आणि तें अगदीच गैर असे मानण्याचे कारण नाही... ते असो. फतेच्या मानसिक तळमळीला काय योग्य उत्तर द्यावे हे मला चटकन सुचत नव्हते हे सत्य Nine hours ची 'गोष्ट' काहीशी अशी.

एक देश असतो. हिंदुस्थानसारखा. तिथे एक कुटुंब असते. तुळशी-कट्टा, नाकात नथ, नऊ वारी वगैरे धोतर, पुणेरी जोडा, उपरणं, गंध हे सुद्धा. तर त्या कुटुंबात नथू नावाचा मुलगा पण असतो, घराण्याचे आडनाव गोडसे. नथूराम गोडसेच्या बहिणीच्या लग्नात गोंधळ होतो. वडील मारले जातात. आई बांगड्या फोडते. देशात कसली तरी दंगल होते त्याअगोदर नथू मिलिटरीत भरती होण्याचा प्रयत्न करतो; पण गोरे साहेब त्याला हाकलून काढतात. घरचे लोक सुद्धा... वगैरे वगैरे. देशात चाललेल्या दंगलीने नथू पिसाळतो. हे थांबवायचे असेल तर 'त्या' लोकांवर सूड उगविणे आवश्यक आहे असे त्याला जाणवते. (फार्सी भाषेत फिल्म डब करताना अनेक सूचक शब्द इराणी टेलिव्हिजनने गाळले असावेत असा माझा अंदाज ... भारत–इराण मैत्री टिकविण्याचा इराणचा एक प्रयत्न.) सूडाच्या भावनेने पेटलेला नथूराम मार्गदर्शनाची वाट पहात असतो. त्या वेळचे त्याच्या चेहऱ्यावर उमटणारे वेगवेगळे हावभाव दर्शविण्याचा प्रयत्न प्रख्यात जर्मन नट हॉर्स्ट बुकहोलझ करीत असताना हॉर्स्ट वेडसर आहे की नथूराम ? असा संभ्रम निर्माण होतो. हे सर्व चालू असताना हॉर्स्टला सावरकर–गोळवलकरांसारखी दिसणारी माणसे भेटतात. बरेच काय काय सांगतात. तोपर्यंत हॉर्स्ट संपादक झालेला असतो. एका फॅशन मॉडेलसारख्या तरुणीबरोबर त्याची कशावरून तरी खूप वादावादी होते. फॅशन मॉडेलला हॉर्स्टचा करारी बाणा वगैरे खूप आवडतो – पण ती स्वतः विवाहित असल्यामुळे तिला आपली नैतिक मूल्ये वगैरे सांभाळणे आवश्यक असते. ती अर्थातच प्रचंड श्रीमंत असते. एकदा फॉर्स्ट तिला घेऊन नाशिकला जातो. पुणे ते नाशिक या बसप्रवासात फिल्मडायरेक्टर राजस्थान, मध्यप्रदेश वगैरे प्रांतांमधील रस्त्याकडेला दिसणारे भारतीय दरिद्री सौंदर्य प्रेक्षकांना दाखवितो. नासिकला हॉर्स्ट एका खानावळीत नाशिक व्हिस्की पिऊन बेभान होतो. फॅशनमॉडेलबरोबर एक रात्र झोपण्याचा विचार प्रगट करतो. ती अर्थातच चिडते. अपमानित होते. इथपर्यंत प्रेक्षकांची खात्री झालेली असते की हॉर्स्ट हा एक दिशाहीन, अहंमन्य, दारुडा, वेडसर तरुण आहे.

हे सर्व चालू असताना त्या देशाच्या म्हणजेच हिंदुस्थानच्या राजधानीमध्ये अर्थातच नाव दिल्ली–गांधीजीसारखे दिसणारे भारतीय नट कश्यप हे चरख्यावर सूत काढीत गांधीजींची वेगवेगळी वाक्ये असंबद्ध संदर्भात मंत्री, व्यापारी, पोलिसऑफिसर्स आणि आसपास येणाऱ्या व्यक्तींना सुनवीत असतात. पोलिसांना मात्र कश्यपचा खून होणार अशी कुणकुण लागलेली असते. ते कश्यपच्या तोंडून येणारे गांधीजींचे तत्त्वज्ञान न ऐकता सतत हॉर्स्ट बुकहोलझचा शोध घेत असतात. फिल्मदिग्दर्शकाला नामी संधी मिळते आणि तो पुन्हा एकदा दिल्लीचे बकाल सौंदर्य प्रेक्षकांना डिटेलमध्ये दाखवितो–आणि गाईला नमस्कार करणारी माणसंमुद्धा !

जेव्हा फक्त Nine hours शिल्लक उरतात तेव्हा पोलीस DIG ची खात्री होते. आज कश्यपचा खून होणार ! ते कश्यपला परोपरी समजाविण्याचा प्रयत्न करतात. सूत काढत बसलेले कश्यप हट्टीपणा करतात. ऐकत नाहीत. इथं हॉर्स्ट दिल्लीला येऊन पोहोचलेला असतो. त्याच्या मनात चलबिचल. तो सिनेमा बघतो, वेश्येकडे जातो, दारू पितो. वेश्या त्याचे पिस्तूल चोरते. मग तो तिला थोबाडीत वगैरे मारतो आणि दुसरं पिस्तूल मिळविण्यासाठी जातो. दुसरे पिस्तूल मिळविल्यावर दिल्लीमधील एका अलिशान हॉटेलमध्ये तो फॅशन-मॉडेल तरुणीला भेटायला जातो. ती नवऱ्याची टेनिस मॅच बघण्यात बिझी. गाठभेट होत नाही. इथं अधूनमधून गोपाल नावाचा कुणी-तरी – हॉर्स्टचा भाऊ असावा बारिकसारिक उलाढाल्या करीत असतो. शेवटी नाइन अवर्स मधले काही क्षणच उरलेत ह्याची दिग्दर्शकाला जाणीव होते. पोलिसांची धालमेल वाढत्या प्रमाणात. कश्यप पराकोटीच्या हट्टाला पेटलेले. फॅशन मॉडेल न भेटल्यामुळे बेभान झालेला हॉर्स्ट पिस्तूल शर्टाआड लपवून प्रार्थनास्थळी. प्रचंड गर्दी. गर्दीमध्ये उशीरा मेसेज मिळालेली फॅशनमॉडेल कावऱ्याबावऱ्या चेहऱ्यात नथ्थू–नथ्थू अशी हाक मारीत हॉर्स्टचा शोध घेण्याच्या धडपडीत. गर्दीमधून महात्मा की जय हा प्रचंड जयघोष. त्या जयघोषात हळूहळू पुढे सरकणारा, दारूने डोळे तांबरलेला, घामाने भिजलेला, न्यूरॉटिक् चेहऱ्याचा हॉर्स्ट — आणि समोरून येणारे कश्यप, मॉंटाज्, क्लोजअप्स् – म्युझिक वगैरे सर्व फिल्मी तंत्र पार पडल्यावर कश्यपना नमस्कार करून हॉर्स्टचे ठोऽऽठोऽऽ – फॅशन मॉडेलची दर्दभरी किंचाळी–कोलाहल–हे राम म्हणत कोसळणाऱ्या कश्यपना हॉर्स्टचा प्रणाम —कश्यपांचे उद्गार —

"I bless you my child—I bless you. !"

हॉर्स्टच्या तोंडून हुंदका–

'I killed him and he blessed me... ?

Killed him and he blessed me... '

फॅशन मॉडेल तरुणीचा क्लोजप्. ती कपाळावरचे कुंकू पुसून हातातल्या बांगड्या दगडावर आपटून फोडते.

काय फिल्म का थट्टा ! गांधीवध ही जग हादरविणारी घटना. त्याचं हे प्रेझेन्टेशन. गांधीवध ह्या घटनेवर अंतर्मुख होऊन विचार न करणारा भारतीय सापडणे कठिण... फिल्म बघून मी अर्थातच बेचैन.

'What was the reaction of the people in India to this film ?' खलीलचा प्रश्न.

'I do not know.' माझं प्रामाणिक उत्तर– 'The film was not shown in India. It was banned by the government I am sure nobody has seen this film in India.'

'Why was it banned ?' –खलील आश्चर्यचकित.

'......' मला उत्तर सुचत नाही.

'क्यूं ? – विजयभय्या– ये फिल्म हिंदुस्थानमें क्यूं नहीं बताते ?' फतेचा प्रामाणिक प्रश्न.

उत्तर खरोखरच कठिण. तेहरानमध्ये वर्षाकाठी कमीत कमी तीन-चार वेळा ही फिल्म टेलिव्हिजनवर दाखविली जाते. जगभर गाजलेली Nine hours to Rama भारतामध्ये दाखविण्यास बंदी

का? माझ्या अंदाजाप्रमाणे १९६३–६४ च्या सुमारास ही फिल्म जगात इतरत्र रिलीज झाली असावी; पण भारतात सुरुवातीपासूनच ह्या फिल्मवर बंदी आहे. भारतीय नागरिकांनी ही फिल्म का बघू नये? Why not release the film in India and let the people evaluate the presentation? माझी स्वतःची reaction साधी सरळ आहे– the film deserves to be publicly burnt. माझी कारणे अनेक आहेत. मी स्वत: फिल्मतंत्रज्ञ आहे. तांत्रिक-दृष्टचा फिल्म भिकार आहे हे एक कारण आहेच; पण इतरही अनेक गोष्टी माझ्या विचारसरणीला खटकणाऱ्या आहेत. भारतीय अधिकाऱ्यांनी ह्या फिल्मवर बंदी घालण्याचे कारण मात्र कळत नाही. पूर्वीच्या कॉंग्रेसराजवटीत प्रथमपासूनच बंदी घातली. सध्याच्या जनता सरकारने बंदी उठविल्याचे ऐकिवात नाही. Nine Hours to Rama हिंदुस्थानामध्ये न दाखविण्यामागे असले तर एकच योग्य कारण– एकच महत्त्वाचे objection मला जाणवते. गांधीजींचा रोल करणाऱ्या कश्यपांनी गांधींचे व्यक्तिमत्त्व उभे करण्याचा बराचसा यशस्वी प्रयत्न– उथळ दिग्दर्शनावर मात करून केला आहे. त्यामुळे त्याबद्दल फारसे Objection असण्याचे कारण नाही; पण गांधींचा खून करणारा नथुराम ज्याप्रमाणे दिग्दर्शकाने उभा करण्याचा प्रयत्न केला आहे तो प्रकार हिणकस आहे, ह्याबद्दल हिंदी अधिकाऱ्यांची मनोमन खात्री पटली असल्याची शक्यता जास्त आहे आणि ते बरोबर आहे. हॉर्स्ट बुकहोलम् ह्या न्युरॉटिक चेहऱ्याच्या प्रसिद्ध जर्मन नटाकडून नथुराम गोडसेचे व्यक्तित्व उभे करण्यात फिल्म दिग्दर्शकाने गलिच्छपणा केला आहे. Nine hours to Rama मधला हॉर्स्टने उभा केलेला नथ्थू हा गांधीखून करणारा नथुराम गोडसे नव्हे हे कुणाही भारतीय माणसाला पटेल.

सतत वेश्यागमन करणारा, दारू पिणारा, बदफैली, पिसाट अशा माणसाने गांधींचा खून केला नाही– हे तर सत्य आहे ना? मर्डरर् हा नेहमी तसाच असतो– 'डर्टी हॅरी' फिल्ममधल्या मर्डररसारखा– असे फिल्मवाल्यांचे एक गणित आहे– निदान गोऱ्या चामडीच्या फिल्मवाल्यांचे तरी. त्यांचा समाजच तसा आहे. 'कॉम्प्युटराईज्ड कोड' वरून त्यांचे सर्व आराखडे ठरलेले– सर्वच गोष्टींचे– त्याच-प्रमाणे मर्डरर् किंवा असासिन कसा असावा ह्याचे सुद्धा एक 'कोड' ठरलेले आहे. टाइप ठरलेला आहे. त्या आराखड्यात बसेल असाच नथुराम दिग्दर्शकाने प्रेक्षकांपुढे ठेवला ह्यात तसे नवल वाटण्यासारखे काही नाही. तर प्रश्न आहे Nine Hours to Rama भारतात का दाखविला जात नाही हा. कारण, माझ्या मते त्यात दाखविलेला चारित्र्यहीन नथुराम. प्रेसिडेंट केनेडीला मारणारा, मार्टिन ल्यूथर किंगचा वध करणारा आणि गांधींचा खून करणारा– हे सगळे असासिन– 'हत्यार' एकाच दर्जाचे आणि टाइपचे काय? प्रश्न फार विचित्र आहे. एखाद्या महान नेत्याच्या मृत्यूला कारणीभूत होणारा, त्या महान व्यक्तीची प्रत्यक्ष हत्या करणारा ॲसासिन ह्याचा 'दर्जा' ठरवायचा? अनेकांना ही विचारसरणीच कदाचित पटणार नाही; पण जरा सबूर. नाइन अवरस् टू रामा पहा आणि त्यात दाखविलेला नथूराम तुम्हाला मान्य होईल काय हे सांगा. गांधींचा खून करणारा जर बदफैली, दारुडा, पिसाट असेल तर त्यामुळे गांधींच्या कार्यालाच संपूर्ण मूठमाती मिळेल! नथूराम हिरो होता की नाही हा प्रश्न नाही. असासिनचे मनोविश्लेषण करण्याचा मी उपद्व्याप करीत नाही. नथूराम गोडसे हा एक तत्त्वनिष्ठ माणूस होता. गांधीजींना भारताचे तुकडे होऊ नयेत असे जितके वाटत होते तितक्याच प्रखरतेने भारत अखंड रहावा असे स्वप्न बाळगणारा तो होता! गांधीजी 'महात्मा' होते. नथूराम सामान्य माणूस! दोघांचे स्वप्न एकच– मार्ग वेगळे! एका तत्त्वनिष्ठ माणसाने गांधींचा खून केला हे नाकारणे गांधींनाच अपमानास्पद ठरेल असे मला वाटते. गांधींचा वध ही जग हादरविणारी घटना. जगभरच्या विचारवंतांच्या मनात त्या घटनेने प्रचंड खळबळ माजविली. अनेक तर्ककुतर्क केले गेले. अनेक ग्रंथ लिहून झाले... आज तीस वर्षांनंतर या घटनेकडे पुन्हा एकदा नव्याने पहाण्याची जरूर भासली तर ते फारसे चूक आहे का? इतिहासाकडे नव्या दृष्टिकोनातून सतत पहाण्याची तयारी हवी. इंग्रज लोकांनी लिहिलेला भारताचा इतिहास आम्ही किती दिवस वाचणार? त्याचप्रमाणे इंग्रज विचारांचा आणि चाली-रीतींचा जबरदस्त प्रभाव पडलेल्या भारतीयांनी लिहिलेला भारताचा तथाकथित इतिहास तरी किती दिवस वाचावा? नथूराम गोडसे आणि गांधीखून ह्या घटनेचा स्वच्छ मनाने विचार करायचे ठरविले तर त्यात नुकसान आहे का? एका तत्त्वासाठी, एका तत्त्वनिष्ठ माणसाने, एका तत्त्वनिष्ठ महात्म्याचा खून केला! नथूरामच्या हातून जे घडले तो एक महान अपराध हे निर्विवाद; पण ह्या घटनेकडे डोळसपणे पहाण्याची आपल्यात ताकद पाहिजे.

गेली चौदा वर्षे सगळा एशिया भटकलो आणि अनेक देशांच्या विमानतळांवर उतरताना इमिग्रेशन फॉर्म भरताना, Nationality ह्या ओळीसमोर Indian असे नेहमी लिहिले. (By the way प्रत्येक देशाचा immigration फॉर्म अभ्यासण्यासारखा असतो. भारतामध्ये येताना हेल्थ अथॉरिटीज 'तुम्ही ह्या अगोदरच्या नऊ रात्री कुठे होता?' असा सवाल करतात. नशीब! कुणाबरोबर होतात ते विचारीत नाहीत! काही देश 'धर्म' विचारतात–तर अमेरिकेसारखे प्रगत राष्ट्र 'रंग' हा प्रश्न अजूनही विचारते!) इमिग्रेशन फॉर्मवर नॅशनॅलिटी लिहिण्याची पाळी आली ती व्हिएट-नाममध्ये–दक्षिण व्हिएटनाममध्ये. १९६३ साली मी प्रथम भारता-बाहेर गेलो. सायगॉन. १९६३ ते १९६६ ह्या काळात दक्षिण व्हिएटनाममधील घडामोडींवर अनेक फिल्मस् केल्या. त्या काळात तिथे बरीच भारतीय मंडळी होती. बहुतेक सर्व काळा बाजार करणारे, परकीय चलनाची गैरकानुनी देवाणघेवाण करणारे, जग-भरचे वार्ताहर आणि दक्षिण व्हिएटनामीज नागरिकांच्या दृष्टीने 'भारतीय' ह्याची व्याख्या एकच 'पैशाचा काळा बाजार करणारा!' भारतीय दूतावासाच ह्याची कल्पना नव्हती असे म्हणणे धाडसाचे ठरेल! काळा बाजार करणाऱ्यांना भरचौकात गोळ्या घालून मार-ण्याची सायगॉनमध्ये फॅशन होती. काही जणांना सक्तमजुरीची शिक्षा दिली जात असे. एका भारतीय व्यापाऱ्याच्या घरात, लाकडी जिन्याच्या फळ्यांखाली दडवलेले लाखो डॉलर्स आणि पाउंडस्चे चलन सापडले. मिलिटरी ट्रायब्युनलसमोर साक्ष देताना त्या व्यापाऱ्याने 'परकीय चलन जमविण्याचा मला छंद आहे' असे विनोदी समर्थन केले होते. दक्षिण व्हिएटनामच्या सर्व वर्तमान-पत्रांतून ही गोष्ट ठळकपणे छापून आली होती.

दक्षिण व्हिएटनाममध्ये काळा बाजार करणारे भारताची इमेज खड्ड्यात घालीत असताना समाधान वाटून घेण्यासारखी एकच गोष्ट...दक्षिण व्हिएटनाममध्ये लोकशाही असावी म्हणून सायगाव-मधील मिलिटरी राजवटीला मदत करून लाखो लोकांचा बळी घेणारे, स्वातंत्र्यप्रेमी अमेरिकन्स स्वतःच एवढ्या मोठ्या प्रमाणावर काळा बाजार करीत होते की, त्यांच्यासमोर आपले भारतीय काळा बाजारवाले झोपडपट्टीशेजारी सुकी मासळी विकणाऱ्यांसारखे !

भारतीय संस्कृतीचे लागेबांधे श्रीलंका, बर्मा, थायलंड, लाओ, कंबोडिया, व्हिएटनाम आणि इंडोनेशिया ह्या आग्नेय आशियायी राष्ट्रांबरोबर फार जवळचे आहेत. त्याचप्रमाणे अफगाणिस्तान, इराण आणि तुर्किस्तान ह्यांच्या संस्कृतींची भारतावर छाप पडली आहे. आग्नेय आशियामधील राष्ट्रांच्या संस्कृतीत भारतीय आणि चिनी संस्कृतीची सरमिसळ पदोपदी पाहवयास सापडते.

आज दक्षिण आणि उत्तर व्हिएटनाम एक झाला आहे. अमेरिकेसारख्या बलाढ्य देशावरोबर निकराचा लढा देऊन 'No country can fight and win a military war on somebody else's land' या कनफ्युशिअसच्या विधानाची सत्यता पटवून दिली आहे. खंडित व्हिएटनाम अखंड झाला आहे. हो ची मिन्हचे स्वप्न अर्धे पुरे झाले आहे.

पूर्वीच्या फ्रेंच राजवटीखाली व्हिएटनामबरोबरच लाओ आणि कंबोडिया हे दोन देश देखील इंडोचायना ह्या नावाने ओळखले जात. डियन् बिअन् फू येथे फ्रेंचांचा पराभव होचिमिन्हच्या राष्ट्रीय स्वयंसेवक दलाने केला. सत्ता सोडून जाताना फ्रेंच लोकांनी इतर वसाहतवादी साम्राज्यवाद्यांप्रमाणे व्हिएटनामचे दोन तुकडे केले. त्याचबरोबर लाओ आणि कंबोडिया हे दोन देश पण स्वतंत्र झाले. लाओ आणि कंबोडिया देशांची संस्कृती, राहणी, भाषा ही थायलंडशी जास्त मिळतीजुळती. तीन्ही देश बुद्धधर्मीय आणि भाषेमध्ये पाली-मधील अनेक शब्द. रामायण, महाभारत हे जवळजवळ धर्मग्रंथच ! कंबोडियावर भारतीय संस्कृतीची बरीच छाप. श्रीविजया साम्राज्य-कालीन अंकोरवट हे उदाहरण. थायलंडचा राजा भूमिबोल यडुलडेज (भूमिपाल अतुल्यतेज) हा रामाचा अवतार मानला जातो. थायलंडच्या नृत्य आणि कला अकादमीच्या प्रवेशद्वारी गजाननाची भव्य मूर्ती आहे. शाक्यमुनीला थायलोक आद्य नाटककार मानतात.

व्हिएटनामची संस्कृती, राहणी, भाषा—कंबोडिया आणि लाओ-पेक्षा एकदम वेगळी. भाषा चिनी भाषेसारखी. आहार बराचसा चिनी पद्धतीचा. फ्रेंच culture चा पण जबरदस्त प्रभाव. असा हा इंडोचायना. फ्रेंच गेले. जाताना त्यांनी तोडमोड केली. अमेरिकन आले. त्यांनी लाखो लोक मारले. शहरे, जंगले, शेतीची जमीन आणि सांस्कृतिक जीवन उद्ध्वस्त केले. हार खाल्ली आणि काळ्या तोंडाने पळ काढला !

थायलंड हा सुरुवातीपासूनच स्वतंत्र देश. कुठलीच परकीय सत्ता तिथे राज्य करू शकली नाही. त्यामुळे थाय माणसाचा कणा ताठ ! स्वतःची अशी खास संस्कृती टिकून राहिलेली (जाता जाता त्या ओघाने एक आठवण. बँकॉकला एका परिषदेसाठी भारतामधून एक विद्वान आले होते. आमच्याकडे उतरले होते. दोन दिवसांची परिषद आटोपून परत जाताना त्यांनी आश्चर्योद्गार काढले—' हे थाय लोक भलतेच मागासलेले दिसतात. कुणालाच इंग्रजी येत नाही. ह्यांचे शास्त्रज्ञ आणि मंत्री देखील थाय भाषेतच भाषणे करतात ... ' ह्या विद्वानांना समजावून सांगण्याचा मी अजिबात प्रयत्न केला नाही.) व्हिएटनाम युद्धाच्या वेळी थायलंड हे अमेरिकन GI चे अत्यंत आवडीचे विश्रांती आणि करमणूकस्थान. त्यामुळे थोडाफार अमेरिकन संस्कृतीचा ठसा...म्हणजेच वाढता वेश्याव्यवसाय, दारूचे गुत्ते, जुगाराचे अड्डे आणि बसक्या नाकाची, निळ्या डोळ्यांची, सोनेरी केसांची हजारो अनौरस मुले.

अशा ह्या आग्नेय आशियामधील, युद्धाने जवळजवळ बेचिराख झालेला खंडित व्हिएटनाम पुन्हा अखंड झाला. एवढेच नव्हे तर वर्षभरातच आग्नेय आशियात निर्माण होणारी एक प्रमुख सत्ता हा मान देखील त्याने मिळविला. ह्या सर्वांतून आपण भारतीयांनी एक फार मोठा धडा घेण्यासारखा आहे. गांधीजी आणि हो ची मिन्ह ह्यांच्या तुलनेत हो ची मिन्ह काकणभर श्रेष्ठ ठरण्याची शक्यता नाकारता येणार नाही. अखंड व्हिएटनामचे स्वप्न दक्षिण आणि उत्तर व्हिएटनामीज लोकांच्या मनात सतत पेटवीत ठेवण्याचे सामर्थ्य त्याचे होते. त्यामुळे व्हिएटनामीज लोकांच्यात एक उग्र शिस्त बाणली गेली. अमेरिकेसारख्या बलाढ्य देशाच्या अमानुष बाँब-हल्ल्याला समर्थपणे तोंड देण्याची प्रचंड ताकद त्यांच्यात निर्माण झाली. देशासाठी बलिदान हा राष्ट्रीय धर्म ठरला ! दक्षिण व्हिएट-नाममधील व्हिएतकाँग राष्ट्रीय स्वयंसेवकांनी तितक्याच निकराने लढा देऊन अखंड व्हिएटनामचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी स्वेच्छेने बलिदान केले आणि अमेरिकेची अब्रू धुळीला मिळविली. हे व्हिएट-नामीज फार मोठ्या दर्जाचे. जिद्दीने आणि स्वातंत्र्यप्रेमाने धगधगीत पेटलेले, झपाटलेले. आपल्यासारखे बुद्धिवादी आणि प्रचंड बडबड, वटवट करणारे नव्हेत ! कर्मवादी. त्यांचा नेता हो ची मिन्ह मित-भाषी— द्रष्टा — सदासर्वदा उपदेशामृताचे डोस पाजण्याची खाज नसलेला. त्यांनी आपल्या नागरिकांना कर्मयोग शिकविला, थंड वटवट नाही आणि म्हणूनच दोन व्हिएटनाम एक होण्याचे त्याचे स्वप्न पूर्णत्वाला आले. (व्हिएटनाम एक होण्याने हो ची मिन्हचे स्वप्न अर्धेच पूर्ण झाले असावे का अशी एक शंका आजकाल माझ्या मनात निर्माण होत आहे ! ...)

खंडित व्हिएटनाम अखंड होऊ शकतो तर भारत का अखंड होणार नाही ? असा प्रश्न साहजिकच निर्माण होईल...होतोच आहे; पण सबूर !

ती ताकद, ती निष्ठा, ते स्वातंत्र्यप्रेम, ती जिद्द आणि निष्काम-कर्म करून Unity साठी आत्मसमर्पण—बडबड न करता—करण्याची भारतीय माणसाची वृत्ती आहे का ? व्हिएटनाम एक कसा झाला ? का झाला ?—त्या घटनेचे महत्त्व काय?—याची जाणीव तरी तुम्हा—आम्हाला आहे का ? ते कळण्याइतकी मानसिक प्रगल्भता भारतीय मनात आहे का ?...

◻

# एक सॅंपल

' अग, तू इंडियाला जाणार आहेस ना, तेव्हा मी दिलेल्या शिफॉनच्या दोन साड्या माझ्या आईसाठी तुला घेऊन गेल्याच पाहिजेत हो !'

आय्. सी. एस्. बापाची एक कन्या, ओठांचा चंबू करून, मराठीला कॉन्व्हेंटी कम्हली लावीत माझ्या बायकोला सांगत होती. बोलताना प्लीजबीजची भाषाच नव्हती. हिचा बाप आय्. सी. एस्., भारतात मोठ्या हुद्द्यावर, नवरा इकडच्या एका कन्स्ट्रक्शन कंपनीत मोठ्या पगाराच्या नोकरीवर. त्यामुळे इतर मंडळी तिच्या दृष्टीने झुरळे-मुंग्या !

'अग, माझ्या ममीनं सांगून ठेवलंय- अगदी बजावून-इकडून कुणीही इंडियाला जाणार असले की, त्यांच्याबरोबर दोन साड्या पाठविल्याच पाहिजेत. इकडून माणसेदेखील खूप जातात ना इंडियाला सारखी. मी नेहमी प्रत्येकाबरोबर दोन-दोन साड्या पाठविते. तुला पण नेल्याच पाहिजेत. आमच्या ममीचा कायदा आहे !'

'अग, पण इतक्या साड्या काय करायच्यात तुझ्या आईला ?' बायकोचा भोळसट प्रश्न.

'अग, तुला तर काही कळतच नाही. इथं दहा-पंधरा डॉलर्सना मिळते ना साडी. म्हणजे व्हाइट रेटनं शंभर-दीडशे रुपये धर; पण इंडियात तीनशेच्या वर मिळतात एकेका साडीचे !'

'असला धंदा करणं मला नाही बाई आवडत !' बायकोनं नाक मुरडून नापसंती दाखविली.

'वेडीच आहेस ! असला धंदा करायला ममी काही इतकी लो नाही. पैशांची पण तिला गरज नाही. डॅडींच्याबरोबर तिला नेहमी सगळ्या इंपॉर्टंट फंक्शन्सना जावे लागते ना, मग नंतर खूप खूप सोशल वर्क पण करावे लागते, म्हणून ममीने आयडिया काढली. मी इथून साड्या पाठविल्या की, म्हैनाभर वापरून ती त्या विकते! व्हाइटच्या हिशोबाने होणारे पैसे वळते करून वरचे मिळालेले ती ब्लाइंड स्कूल किंवा अनाथ बायकांच्या हॉस्टेलला डोनेट करते. छान आहे की नाही आयडिया ? म्हणजे फंक्शन्सना दर खेपेला नवीन साड्या, इंपोर्टेड साड्या विकल्यामुळे कॉन्टॅक्टस् पण वाढतात आणि पुन्हा चॅरिटी. तू घेऊनच जा बाई दोन साड्या. नाही तर ममी माझ्यावर एकदम नाराज होईल ! अग, आपण परदेशात राहिलो म्हणून इंडियातले सोशल वर्क विसरून कसे चालेल ? नीडी पिपलसाठी थोडे तरी नको का करायला...ह्या महिन्याचा फेमिना बघितलास का ? ममीबद्दल लिहून आलेय- माझासुद्धा फोटो छापलाय-' □

# ॲरेंज्ड मॅरेज !

एक हॅंडसम् तरुण. रुबाबदार व्यक्तिमत्त्व, हुषार, मनमोकळा आनंदी स्वभाव, खिलाडू वृत्ती. भारतात फॉरेन कोलॅबोरेशनमध्ये फाइन केमिकल्स् बनविणाऱ्या एका कंपनीचा डायनॅमिक यंग मार्केटिंग डायरेक्टर. कंपनीचा धंदा पश्चिम आशिया आणि पर्शियन गल्फ स्टेटस्मध्ये वाढविण्यासाठी त्याचे इथे पोस्टिंग झाले. आला तेव्हा बॅचलर होता.

मध्यंतरी मुंबईला ऑफिसच्या कामासाठी गेला असताना लग्न करून बायकोसह परतला. त्याच्या रुबाबदार व्यक्तिमत्त्वाला शोभेल अशी देखणी बायको त्याने निवडली होती. सडसडीत बांध्याची, गोरीपान, नाकेली. वेषभूषा अतिशय मॉडर्न. हिंदी सिनेमातल्या नटीसारखी. केस कापलेले. इंग्रजी, मराठी आणि हिंदी अतिशय सफाईदार बोलायची.

एव्हढे सगळे असून तिच्या वागण्यात ताठा, गर्व, उद्दामपणा ह्याचा मात्र जरादेखील लवलेश नव्हता. सिगरेट ओढायची, ड्रिंक घ्यायची, काट्याचमच्यांनी व्यवस्थित जेवायची - सगळ्या हालचालीत सहजपणा होता-पण मला मात्र एक गोष्ट खटकली- तिचा सुंदर चेहरा अतिशय कोरडा होता, आवाजात विचित्र थंडपणा आणि बदामी डोळ्यांत विलक्षण निर्जीवता. तिच्या सर्व वागण्यातून एक न सांगता येण्यासारखा मेकॅनिकल् कोल्डनेस मला जाणवला.

ओळख वाढली. जाणेयेणे वाढले. वारंवार गाठीभेटी पडू लागल्या. त्या दोघांच्याबद्दलचे माझ्या मनातले कोडे मात्र दिवसागणिक जास्तच अनाकलनीय बनत चालले. तो उमदा, हसतमुख-ही-मख्ख-पुतळ्यासारखी ! एकदा कुणाच्या तरी घरी पार्टीनंतर 'कुणाचं लग्न कसं झालं.' हा विषय निघाला. चेष्टामस्करी सुरू झाली. मी थट्टेनं त्याला म्हटलं-

'तुमचे दोघांचे कॉलेजातच ठरले असणार !'

मनमोकळे हसून, आपल्या बायकोच्या पाठीवर थाप मारून तो म्हणाला,

'-तुम्हाला सगळ्यांना आमचं लव्हमॅरेज असं वाटत असणार ह्याची मला खात्रीच होती-बट डोन्ट् बी शॉकड्-माझे अरेंज्ड मॅरेज आहे ! आईबाबांची पसंती, एव्हढेच नव्हे तर आमच्या कंपनीच्या बोर्ड ऑफ् डायरेक्टरस्ची पसंती झाल्यावर ठरलेलं !'

'कंपनीचा काय संबंध ?' मी जरा आश्चर्याने विचारले.

'नाहीं कसा ? बॅचलर होतो तेव्हा ठीक होते. पण लग्न करून पार्टनरं आणल्यावर युवर प्राइव्हेट लाइफ् काउंटस् ए ग्रेट डील इन् डिसायडिंग युवर करिअर. पार्ट्या असतात, फंक्शनस् असतात. जोडीने जावे लागते. व्हिजिटर्सना घरी एन्टरटेन् करावे लागते-ए प्लॉट डिपेंडस् ऑन हाऊ युवर वाइफ मॅनेजेस दीज अफेअरस्. आम्हा सगळ्या यंग एक्झिक्युटिव्हज्ना आमच्या कंपनीने कॉशन दिली होती. हिचा बायोडाटा आणि फोटो मी आमच्या मॅनेजिंग डायरेक्टरना पाठविला. एंगेजमेंटच्या अगोदर ही इन्व्हाइटेड अस फॉर ड्रिंक्स आणि पहिल्या भेटीतच खूष होऊन तो म्हणाला, गो अहेड यंग मॅन-यू हॅव मेड ए फाइन चॉइस !'

आणि पुन्हा बायकोच्या पाठीवर थाप मारून तो खळखळून हसला. कंपनीबद्दलचा अभिमान त्याच्या उमद्या चेहऱ्यावरून ओसंडत होता. नोकरीमध्ये आपण झपाट्याने वर चढणार असा आत्मविश्वास दाखविणारी चमक त्याच्या घाऱ्या डोळ्यांत खेळत होती.

बदामी डोळे मात्र निर्जीव होते !

मी चक्रावून गेलो. मला वाटले होते फक्त कथा–कादंबऱ्यांतून अशा गोष्टी लिहिल्या जातात. लग्न करणे म्हणजे आयुष्याचा जोडीदार निवडणे; पण जोडीदाराची व्याख्या काय आणि आजकाल कोण कशासाठी लग्न करील हे सांगणं कठिण झालेय, हे मात्र खरे.

माझ्या मनात उगाचच अनेक प्रश्नांचा गुंता झाला. करिअर करण्यासाठी पत्नी नावाची डेकोरेटिव्ह वस्तू ह्याने मिळविली. मॅनेजिंग डायरेक्टरच्या पसंतीप्रमाणे निवड; पण तिच्या संमतीची कुणी चौकशी केली होती का ? का तो प्रश्नच निर्माण झाला नाही ? हँडसम यंग मॅन विथ् ए ब्राइट करिअर–! ! पण तिचं दुसऱ्या कुणावर प्रेम जडलेले असले तर ? नटविलेल्या बाहुलीसारखे जगणे तिला पसंत होते का ? तिला लवकर आई व्हावे असे तर वाटत नसेल ? करिअरच्या नादाने झपाटलेला नवरा तिचे मातृत्व,तिच्या इच्छेआड लांबवीत तर नसेल ? हजारो प्रश्न.

पार्टीला हे जोडपे भेटले की तिला मनमोकळं बोलते करावे असे खूप वाटायचे–पण तिचा थंड औपचारिकपणा अभेद्य होता. तिच्या निर्जीव बदामी डोळ्यांआड कसले तरी खोल दुःख दडल्याचा मला भास व्हायचा.

कदाचित हे सगळे माझ्या मनाचे खेळ असतील. ती दोघे एकमेकांना जीव लावून सुखाने जगत असतील. मागच्या महिन्यातच ही जोडी भारतात परतली. एअरपोर्टवर पोहचवायला गेलो. तो नेहमीसारखा आनंदी –त्याच्या बाजूला 'मॅनीक्वीन्'सारखी ती. सगळेच गू ! ◻

---

# न परततीची वाट

तेहरानमधल्या एका मोठ्या सरकारी हॉस्पिटलच्या तळमजल्यातील शवागारात मी कॅमेरा आणि लाइटस्‌ची जुळवाजुळव करीत होतो. माझे इराणी सहकारी न बोलता सर्व काम पार पाडीत होते. सर्व तयारी झाली. शवागाराच्या कर्मचाऱ्याला मी खूण केली. भिंतीमधला एक व्हॉल्ट त्याने उघडला. रेफ्रिजरेटरचे दार उघडावे तसा गारवा खोलीत पसरला. त्या गारव्यात एक कसला तरी विचित्र दर्प होता. व्हॉल्टमधून त्या कर्मचाऱ्याने स्ट्रेचर बाहेर ओढले. त्या स्ट्रेचरवर पांढऱ्या चादरीत गुंडाळलेला एक मृतदेह होता. त्या मृतदेहाचे वजन करून नोंद केली गेली. प्रेत एका ट्रॉलीवर ठेवले आणि शवच्छेदनाच्या खोलीकडे नेण्यास सुरुवात केली.

'O. K. – कट्' मी कॅमेरामनला सूचना दिली. दुसऱ्या शॉटसाठी हातात कॅमेरा घेऊन कॅमेरामनला दुसऱ्या एका ट्रॉलीवर बसविले आणि प्रेताच्या ट्रॉलीबरोबर 'चालता' शॉट घेत आम्ही शवच्छेदनाच्या टेबलापाशी पोहोचलो. शवच्छेदन करणाऱ्या डॉक्टरने प्रेतावरील चादर काढली आणि हत्यारे घेऊन तो कामाला लागला. वीस–बावीस वर्षांच्या तरुणाचे ते प्रेत होते. त्याच्या डोक्यावरचे सगळे केस तासलेले होते आणि कवटीवर नंबर लिहिला होता, २५५। बा७७.

अफू आणि हिरोइन ह्या अमली पदार्थांच्या अतिसेवनामुळे त्या तरुणाला मृत्यू आला होता. त्या तरुणाच्या प्रेताचे शवच्छेदन चित्रित करीत असताना माझ्या मनात अनेक प्रश्न निर्माण होत होते. इराणी तरुणांमध्ये 'हिरोइन' ह्या अत्यंत घातक अमली पदार्थाचे सेवन करण्याची प्रवृत्ती दिवसेंदिवस वाढत आहे. एखाद्या अमली पदार्थाच्या सेवनाची सवय जडण्याचे खरे कारण काय असू शकेल ? दोस्तांच्या आग्रहाला बळी पडून चेष्टेच्या भरात काही तरी नवीन साहस करण्याच्या नादाने बरेच जण व्यसनाधीन होतात. काही जणांची सुरुवात अपघातात्मक असते – नकळत झालेली–एक-दोनदा हिरोइन सेवन करतात आणि मग त्या व्यसनाचे कायमचे गुलाम बनतात. बहुतांशी तरुण कशापासून तरी सुटण्यासाठी–स्वप्ननगरीत काल्पनिक सुखात रमण्यासाठी अमली पदार्थांच्या सेवनाची सवय जडवून घेतात.

जागतिक वैद्यकीय मताप्रमाणे हश्‌हिश्, गांजा, चरस, अफू आणि LSD ह्या पदार्थांच्या व्यसनाधीन झालेल्या व्यक्तीला औषधोपचारांनी आणि मानसोपचारांच्या प्रयत्नांनी त्या व्यसनापासून संपूर्णपणे परावृत्त करणे शक्य असते; पण 'हिरोइन'चा गुलाम बनलेल्या व्यक्तीला मृत्यूच फक्त व्यसनातून सोडवू शकतो ! हिरोइनचे व्यसन फार चटकन लागते. एक–दोन वेळा सेवन करताच त्याची सवय लागते. मन आणि शरीर पहाता पहाता हिरोइनचे गुलाम बनते. युरोप आणि अमेरिकेत हिरोइन पाण्यात मिसळून रक्तवाहिनीमध्ये टोचून घेण्याची पद्धत आहे. काही लोक हिरोइनची पावडर

तपकिरीप्रमाणे नाकाने ओढतात. इराणमध्ये हिरोइनची पावडर मेणबत्तीच्या ज्योतीवर तापवून त्या धुराचा भपकारा स्त्रासावाटे आत घेऊन सिगरेटच्या धुराबरोबर गिळला जातो. हिरोइन-सेवनाची ही पद्धत फार घातकी मानली जाते. अशा सेवनाच्या वेळी 'ओव्हरडोज' झालेला कळत नाही. परिणाम मृत्यू !

अशा प्रकारे बळी पडलेल्या, २५५।ब।७७ नंबर लागलेल्या, एका तरुणाच्या शवच्छेदनाची फिल्म घेण्याचे काम चालले होते. लिव्हर, स्प्लीन, आतडी, जठर, हृदय... शवच्छेदन करणारा डॉक्टर काळजीपूर्वक तपाशीत होता. कॅमेऱ्याने आम्ही डीटेल्स टिपीत होतो. फिल्म रंगीत होती. पडद्यावर पहाताना हा प्रकार अतिशय धक्कादायक ठरणार होता. इराणी विद्यार्थ्यांना हिरोइनचे व्यसन लागण्याआधीच त्यापासून परावृत्त करण्याच्या उद्देशाने फिल्म तयार केली जात होती. हिरोइनच्या व्यसनाचा शेवट अटळ मृत्यू हा संदेश पोहोचविण्याचा एक प्रयत्न.

१९७७ साली हा इराणी तरुण हिरोइनच्या व्यसनाने आयुष्य सुरू होण्याअगोदरच मेला. पश्चिम आशियामध्ये घडलेल्या ह्या मृत्यूचा आणि आग्नेय आशियामधील व्हिएतनामच्या युद्धाचा काही संबंध आहे का ? माझ्या मते निश्चित आहे.

अफीमबाज म्हटले की आपल्या डोळ्यांसमोर चिनी माणूस येतो. माओ-त्से-तुंगच्या क्रांतीअगोदर संपूर्ण चीन अफूसेवनाच्या व्यसनाधीन होता. चीनमध्ये अफूचे पीकदेखील भरमसाठ. आपण जसे पान खातो तसे चिनी लोक अफूसेवन करायचे. माओने चीनमध्ये क्रांती घडवून आणली त्याचबरोबर उगवत्या पिढीला मार्गदर्शन करून अफूच्या व्यसनापासून संपूर्ण परावृत्त करण्यात शंभर टक्के यश मिळविले. आजचा तरुण चिनी अमली पदार्थांचे सेवन करीत नाही. चीनमध्ये तयार होणारी अफू चीनबाहेर विकली जाते—मानवाला कल्याणकारक औषधे बनविण्यासाठी.

व्हिएतनामच्या युद्धात जेव्हा अमेरिकेने प्रत्यक्ष भाग घेतला तेव्हा अमेरिकन सोल्जरांना कळत-नकळत अफूसेवनाची सवय लागली. चीन, लाओस आणि थायलंड येथून मोठ्या प्रमाणावर अफू दक्षिण व्हिएतनाममध्ये विकली जाऊ लागली. अमेरिकन दलालच हा धंदा करीत होते. स्वतःच्याच सोल्जरांना एका भयानक व्यसनाचे गुलाम बनवीत अमाप पैसा कमवीत होते. व्हिएतनाममध्ये दोन वर्षांची युद्धकामगिरी बजावून मायदेशी परतणारा अमेरिकन सोल्जर पक्का अफिमबाज झालेला असायचा! अशा अफिमबाज जवानांना अमेरिकेत अफू पुरविण्यासाठी ह्या अमेरिकन दलालांनी मजबूत जाळे विणले. वेगवेगळ्या मार्गांनी अमेरिकेत अफू पोहोचविली जाऊ लागली. थायलंड किंवा लाओस येथे सरासरी हजार रुपये किलोच्या भावाने मिळणाऱ्या अफूची किंमत अमेरिकेत पोहोचेपर्यंत दोन लाख रुपये किलोइतकी होत असे. दलालांचा फायदाच फायदा ! पुढे इंटरपोल आणि एफ्. बी. आय्. ह्यांनी अफूविरोधी कडक मोहीम सुरू केल्यावर मोठ्या प्रमाणात अफूचा व्यापार करणे ह्या दलालांना कठीण झाले. त्यातूनही दलालांनी मार्ग काढला. अफूवर साधी प्रक्रिया करून तिचे हिरोइनमध्ये रूपांतर करायचे. बघता बघता थायलंड आणि लाओसमध्ये अफूपासून हिरोइन बनविण्याच्या डिस्टिलरीज वेगाने काम करू लागल्या. एक किलो अफू नेण्याऐवजी शंभर ग्रॅम हिरोइन पोलिसांना चुकवून नेणे सोपे झाले. अफिमबाजाऐवजी अमेरिकन तरुण 'हिरोइनकश' झाला. आज अमेरिकेत एक किलो हिरोइनची किंमत पन्नास हजार डॉलर आहे. (जवळजवळ चार लाख रुपये !)

आग्नेय आशियातून जेव्हा हिरोइनचा व्यापार सुरू झाला तेव्हा आशिया आणि युरोपच्या वेशीवर असलेल्या तुर्कस्तानमध्ये हिरोइनच्या डिस्टिलरीजना पेव फुटले. तुर्कस्तान आणि इराण इथे बऱ्याच प्रमाणावर अफूचे पीक निघते. हे अफूचे पीक संपूर्ण नियंत्रणाखाली असले तरी अफरातफर बरीच चालते.

तशात १९७४-७५ मध्ये व्हिएतनामयुद्धाला वेगळे वळण लागून अमेरिकेला तिथून पळ काढावा लागला. आग्नेय आशियामधील अमेरिकेचे वर्चस्व संपले आणि हिरोइनचा व्यापार करणाऱ्या दलालांसमोर मोठा प्रश्न निर्माण झाला. अमेरिकेत हिरोइनचा साठा नियमितपणे पुरविण्यासाठी थायलंड आणि तुर्कस्तान इकडच्या उत्पादनात वाढ झाली. तुर्कस्तानमधले काही हिरोइन इराणच्या बाजारात उतरले. इराणी तरुणांचा बळी घेऊ लागले. त्यांपैकीच एक बळी २५५।ब।७७. डॉक्टर त्याचा कोथळा तपाशीत होता आणि मी विषण्ण मनाने कॅमेऱ्यावर त्याचे डीटेल्स टिपीत होतो.

पडद्यावर हे दृश्य दिसताच तरुण प्रेक्षक हादरणार होता. अंतर्मुख होणार होता—निदान त्याने तसे व्हावे अशी अपेक्षा होती. संदेश होता—'बाबा रे, दुसऱ्या कुठल्याही व्यसनाच्या आहारी जा; पण हिरोइनच्या नादी नको लागूस ! हा मार्ग एकतर्फी आहे. परतीची शक्यता नाही. त्या मार्गाचा शेवट अटळ मृत्यू—अकाली मृत्यू ! जन्माला येऊन आयुष्य फुलण्याअगोदरच आयुष्यातून असा उठून जाऊ नकोस !'

इराणमधले शेवटचे संपूर्ण वर्ष मी 'ड्रग अॅडिक्शन प्रिव्हेनशन' हा विषय हाताळला, इराणियन टेलिव्हिजनसाठी फिल्मस बनविल्या Slide प्रोग्रॅम्स तयार केले, इराणी फिल्मदिग्दर्शकांना मार्गदर्शन केले. हिरोइनचे गुलाम बनलेल्या अनेक तरुणतरुणींच्या मुलाखती घेतल्या. मन सुन्न करणारा विषय. प्रचंड मानसिक ताण यायचा. आजदेखील डोळ्यांसमोरून अनेक चेहरे हलत नाहीत. हिरोइनच्या आहारी गेलेल्या त्या तरुण जीवाच्या यातना, वेदना, व्यथा—नकळत माझ्या व्यथा आणि वेदना झाल्या. ज्याची मुलाखत मी घेत असे तो वर्षभरात मरणार ह्याची मला खात्री होती...त्याला ?—तो एका फसव्या स्वप्ननगरीत जगत होता. मलासुद्धा त्या स्वप्ननगरीत येण्याचा वारंवार आग्रह करीत होता. अनेक वेळा मी अप्रत्यक्षपणे हिरोइनजवळ ओढला गेलो होतो. उंच कड्यावरून खाली पहाताना कधीकधी चटकन दरीत अंग झोकून देण्याची जबरदस्त इच्छा होते तसेच काहीसे. एकदा तरी हिरोइनचा भपकारा-सिगारेटच्या धुराबरोबर छातीत कोंडून घ्यावा आणि त्या स्वप्ननगरीचा अनुभव घ्यावा असा मोह मनाला अनेक वेळा पडला. असेल नसेल तेवढी मानसिक ताकद वापरून प्रत्येक वेळी मोह टाळला. ह्या झटापटीत मनावर असह्य ताण न पडता तरच नवल !

□

# एक विकासयोजना

युनोची नोकरी करताना एक गोष्ट अनेक वेळा जाणवायची आणि ती म्हणजे ह्या इंटर नॅशनल डेव्हलपमेंट - प्रोग्रॅमम्समध्ये डेव्हलपमेंट थोडी पण पसारा जास्त ! प्रत्यक्ष लोकांपर्यंत फार थोडे प्रोग्रॅम्स पोहोचतात. अशा प्रोग्रॅम्सचे प्लॅनिंग नेहमी सिटिवाल्यांनी केलेले असते– So called remote area मधल्या लोकांच्या भल्यासाठी; पण लोकांच्या खऱ्या गरजा, त्यांचे विचार, त्यांचे प्रॉब्लेम्स् ह्या कशाचाही विचार न करता. Planners all orer the world seem to be concerned only about their plan and not the people. सर्वत्र ह्याच प्रकार.

दिल्लीमधले प्लॅनर्स आपआपल्या air-conditioned office मध्ये बसून, महाराष्ट्राच्या लोकांनी काय करावे हे ठरवितात– त्यांना न विचारता ! मुंबईचे प्लॅनर्स आपल्या ऑफिसमध्ये बसून, दिल्लीवाल्यांचे म्हणणे साताऱ्याजवळच्या खेड्यातील लोकांनी कसे अमलात आणावे ह्याचे वेगवेगळे प्लॅनस् बनवितात– साताऱ्याजवळच्या त्या खेड्यातील लोकांचा, त्यांच्या culture चा, त्यांच्या tradition चा, Socio-economic condition चा... कशाचाही विचार न करता. Ultimately the plan fails.

इंटर नॅशनल डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशन्समध्येसुद्धा हेच. न्यूयॉर्क, पॅरिस अगर रोममध्ये तिसाव्या मजल्यावर बसून, मूठभर सिटी ओरिएंटेड् माणसे– तथाकथित EXPERTS developing countries नी काय करावे ह्याचे प्लॅनिंग करतात ! त्या developing countries च्या culture चा, tradition चा... कशाचाही विचार न करता. Planning for sake of planning. planning to satisfy the egos of EXPERTS.

डेव्हलपमेंट प्रॉजेक्टस्– त्यांचे प्लॅनर्स, शास्त्रज्ञ, इतर EXPERTS– आणि ज्यांच्या भल्यासाठी ही सारी धडपड चालू आहे असा 'कॉमन' मनुष्य– ह्यांच्यामध्ये फार मोठी गॅप आहे. ह्या दोन ग्रुपमध्ये अजिबात 'डायलॉग' नाही !

'आम्ही सर्वांनी मिळून इतका सुरेख प्लॅन केला, इतकी नवीन equipment आणविली, परदेशीय शास्त्रज्ञांच्या मदतीने नाना प्रकारचे प्रयोग केले, आमचे शास्त्रज्ञ उच्च शिक्षणासाठी परदेशी पाठवून 'ट्रेन' करून आणले– आणि हे multimillion ollar प्रॉजेक्ट उभे केले– ह्या राजस्थानी शेतकऱ्यांच्या भल्यासाठी; पण ह्या शेतकऱ्यांना कुठे पर्वा आहे ? सगळे रूढीप्रिय आणि मठ्ठ ! जुने सोडायला तयार नाहीत. आमचे सगळे प्रयत्न फुकट जाणार, सगळा पैसा फुकट जाणार'... ही एक बाजू.

आणि दुसऱ्या बाजूला तो तथाकथित रूढीप्रिय, 'मठ्ठ', राजस्थानी शेतकरी ! गांगरलेला. नाना प्रकारचे नवीन प्रश्न निर्माण होऊन गोंधळलेला– अनेक अफवा ऐकून साशंक झालेला; पण कुणीही कुठलीही गोष्ट ह्या प्रॉजेक्टबद्दल– त्याला समजेल अशा भाषेत समजावून सांगण्याचा प्रयत्न केलेला नाही !

पंधरा वर्षांपूर्वी काही 'सरकारी मंडळी' त्याच्या खेड्यात आली होती, दोन-तीन जीप गाड्या आणि नाना प्रकारची इंस्ट्रुमेंटस् घेऊन. बरेच दिवस जमिनीची मोजमापे चालली होती. त्यातल्या एका नकाशा काढणाऱ्या खाकी पॅंटवाल्याला ह्या शेतकऱ्याने विचकत विचकत विचारले होते– 'काय चाललेय ?' खाकी पॅंटवाला सरकारी बाबू मोठ्याने हसत म्हणाला होता, 'हा ऽऽ हा हा ऽऽ... थोड्याच दिवसात इथे मोठा तलाव होणार ! खूप मोठा ! तुमचे खेडे बुडून जाणार ! तुम्हाला सगळ्यांना सरकार त्या डोंगरापलीकडे नवीन जमिनी देणार !...' आणि संध्याकाळच्या सुमारास तो खाकी पॅंटवाला आणि इतर सरकारी मंडळी आपआपल्या जीपगाड्यांत बसून धूळ उडवीत निघून गेली होती. बिचारा शेतकरी हादरलेला– नाना प्रश्नांनी भांबावलेला.

– तलाव होणार ? खेडे बुडणार ? –मग माझ्या घराचे काय ?

– नवीन घर बांधायला पैसा कुठून आणू ?

– बायकोपोरांचे काय करू ?

– ह्या देवळाचे काय ? हे बुडाले आणि देवीचा कोप झाला तर ?

– तलावाचे पाणी एकदम रात्री आले आणि सगळे बुडून मेले तर ?

– माझ्या जमिनीचे काय ? नवीन जमीन कशी असेल ? पडिक निघाली तर पोराबाळांना खायला काय घालू ?

– ही विहीर खणायला घेतली तिचे काय करू ?

– अनेक प्रश्न ! पण कुणीही एकाही प्रश्नाचे सरळ उत्तर त्याला दिले नाही. नुसत्या अफवा !

नंतरच्या पंधरा वर्षांत अनेक घटना घडल्या. नाना प्रकारची माणसे येऊन गेली. गोरीपण आणि काळीपण ! मोठमोठ्या अवजड यंत्राची जा-ये सुरू झाली. काही कळेना ! नुसत्या अफवा, नवीन प्रश्न, नवीन समस्या!

नाही म्हणायला एक मोठी समस्या दूर झाली होती. धरणाची जागा बदलल्याचे त्याला निश्चितपणे समजले होते. तलाव पन्नास मैल पूर्वेला होणार होता. दुसरीच दोन खेडी बुडणार होती. त्याचे घर शाबूत राहणार होते. त्याच्या खेड्याजवळून नदी-

सारखा मोठा कालवा वाहाणार होता. जे जे घडेल ते ते मुकाट्याने पहायचे आणि ह्या सरकारी मंडळीपासून सावध रहायचे असे त्याने ठरविले.

शेवटी एकदाचे धरण पूर्ण झाले. पंडित नेहरूंच्या हस्ते उद्‌घाटन झाले. पंडितजींची गाडी ह्याच्या खेड्यावरून धूळ उडवीत गेली तेव्हा मोठ्या भक्तिभावाने ह्याने हात जोडले होते. धरण पूर्ण झाले होते. मोठा तलाव, वीज, पाटबंधारे आणि शंभर एकरांचे डेमॉन्स्ट्रेशन फार्म-नाना प्रकारच्या शेतीची प्रात्यक्षिके दाखविणारे. धरणाच्या एका बाजूच्या अनेक खेड्यांत अमेरिकन सरकार सुधारणा करणार होते. तलावाच्या दुसऱ्या बाजूची खडी रशियन सरकार सुधारणार होते. जपान, जर्मनी आणि इस्रायल ह्यांचा पण काही खेडी सुधारून दाखविण्याचा विचार दिसत होता.

हा राजस्थानी शेतकरी बिचारा चूप होता. रोज नवीन नवीन भित्तिपत्रके त्याच्या खेड्यात चिकटविली जात होती-पण ह्याला वाचता येत नव्हते—आणि ज्याला येत होते त्याला अर्थ कळत नव्हता. खेड्यातल्या एखाद दुसऱ्या 'टांजीष्टरवर' खास खेडूत मंडळीसाठी हा प्रोग्रॅम त्याने बऱ्याच वेळा लक्ष पूर्वक ऐकला होता—तियेसुद्धा हीच अडचण—भाषा समजत होती; पण अर्थ कळत नव्हता! त्याच्या खेड्याजवळच्या कालव्यातून पाणी वाहात होते—पण पाणी आपले आहे का सरकारी हे त्याला माहीत नव्हते. खेड्यात वीज आली होती; पण दिवा लावण्यापलीकडे तिचा आणखी काही उपयोग आहे ह्याची कुणालाच जाणीव नव्हती! ही वीज सुद्धा घातकी होती. वीज आलेल्या आठवड्यातच 'शॉक'ने त्या खेड्यातला एक मलगा मेला होता.

नवीन प्रकारचे बीबियाणे, नवीन खते ह्याबद्दल ओझरती माहिती त्याच्या कानांवर आली होती; पण हे सगळे कुठे मिळतेय? महाग आहे का? वेळेवर मिळेल का? इत्यादि प्रश्न तसेच राहिले होते. नवीन प्रकारची शेती करण्यासाठी बँकेकडून कर्ज मिळतेय असे त्याला कुणी तरी सांगितले म्हणून त्याने चौकशी केली; पण ह्या कर्जाच्या कटकटी आणि कागदपत्रांच्या भानगडीने तो गांगरला—त्यापेक्षा गावचा सावकार बरा!

ह्या सर्व नवीन घडणाऱ्या गोष्टींबद्दल आपल्या शाळेत जाणाऱ्या मुलाला—त्याच्या गुरुजींनी काही शिकविले असणार अशा आशेने त्याने अनेक प्रश्न विचारले होते; पण आपले गांधीजी, आपला महान देश—असले शिक्षण घेणारे ते पोरगे आपल्या बापाचे शंकानिरसन करण्यास असमर्थ होते.

—आणि म्हणूनच गोंधळलेला हा शेतकरी रूढी सोडायला तयार नव्हता. रूढीमुळे त्याला निदान दोन वेळा जेवायला तरी मिळत होते—ह्या नवीन प्रकारात काय होईल ह्याची त्याला खात्री पटली नव्हती म्हणून जुने सोडायला तो तयार नव्हता.

पन्नास मैलांवरून असलेल्या डेमॉन्स्ट्रेशन फार्मला तो एकदा धीर करून गेला. तिथे कदाचित सर्व माहिती मिळेल अशी त्याला आशा होती. सर्वत्र हिरवेगार! तो थक्क झाला. त्याच्या आयुष्यात इतके हिरवेगार शेत त्याने पाहिले नव्हते. वाळवंटातले नंदनवन! भात, गहू, मका, कापूस-हरप्रकारची लागवड केली होती. नकळत त्याचे हात आकाशाकडे जोडले गेले. प्रसन्न मनाने तो आत गेला—पण कुणालाच त्याच्याकडे लक्ष देण्यास सवड नव्हती. पाच—सहा 'गोऱ्या चमडीच्या' माणसांना एक सरकारी बाबू काही तरी समजावून सांगत होता. इतर सरकारी बाबू चेहरे हसरे करून अदबीने आजुबाजूला उभे होते. ती गोरी माणसे प्रत्येक गोष्टीचे फोटो काढीत होती-त्यातल्या एकाने ह्या शेतकऱ्याला पाहिले, खुणेने जवळ बोलाविले. मक्याच्या शेतात उभे केले आणि त्याचे फोटो काढले. त्याच्या पाठीवर थोपटीत बळजबरीने त्याच्या हातात पाच रुपयांची एक नोट कोंबली आणि मक्याच्या शेताकडून त्यांचा घोळका कापसाच्या लागवडीच्या बाजूला चालला. हा शेतकरीपण त्यांच्यामागोमाग निघाला. एका सरकारी बाबूला वाटले ह्याला आणखी फोटो काढायला देऊन आणखी पैसे मिळवायचे आहेत वाटते?—त्याने शेतकऱ्याला हटकले. शेतकरी बावरला; पण तरी सुद्धा हळूहळू त्यांच्यामागून जात राहिला. हातातली चुरगळलेली पाच रुपयांची नोट त्याने हळूच बाजूच्या झुडपात फेकून दिली आणि एका सरकारी बाबूला काही तरी प्रश्न विचारला. गोऱ्या माणसांच्या तैनातीत रंगलेल्या त्या बाबूने 'अभी नही—ये बडे लोक दिल्लीसे आये हैं—तुम कल आजावो—अभी चलो!' म्हणून त्याला जवळजवळ हाकलून बाजूला काढला.

आणि तो परत निघाला तसाच. मुकाट्याने. नंदनवन पाहून चकित झालेला; पण काहीही न उमगलेला, आला होता तसाच तो परत चालला होता!

प्रॉजेक्ट फार्मला भेट देणारी ती गोरी माणसे खूष झाली होती आणि आपल्या मोठाल्या गाड्यांतून परत चालली होती. त्यांचा रस्ता ह्या शेतकऱ्याच्या खेड्यावरूनच गेला होता. त्या खेड्याच्या आजुबाजूची अतिशय मागासलेली शेती बघून एका गोऱ्या साहेबाने सरकारी बाबूला विचारले, 'तुमचे प्रॉजेक्ट फार्म ह्या खेड्याच्या इतके जवळ असून सुद्धा इकडची शेती इतकी मागासलेली कशी?'—सरकारी बाबू उत्तरला, 'साहेब, हेच तर भारताचे मोठे दुर्भाग्य! आमचा शेतकरी फार रूढिप्रिय आहे—नवीन कल्पना तो मान्य करीत नाही. म्हणूनच आमचा देश असा मागासलेला आहे!' गोऱ्या माणसाने डायरीत नोंद केली आणि गाडीच्या खिडकीतून मागासलेल्या खेड्याचा फोटो घेतला.

राजस्थानी शेतकरी संथपणे आपल्या उंटावरून घराकडे परतत होता. घर अजून तीस-पस्तीस मैल लांब होते. सूर्य मावळायला आला होता. रात्री थोडी विश्रांती घेऊन पुढे वाटचाल. सकाळपर्यंत पोहचणे आवश्यक होते. खुरपणीचे काम अर्धवट पडले होते. उंट संथ गतीने चालला होता.

अशी ही डेव्हलपमेंट प्रॉजेक्टस् अनेक पाहिली. काही बरी काही वाईट! सगळ्यांचा हेतू उदात्त–for the betterment of human life—पण बहुतेक सगळी प्रॉजेक्टस् आपआपल्या चौकटीत अडकलेली—स्वतःच्या success & failure च्या limited वलयात गुंतलेली. एका प्रोजेक्टचा दुसऱ्याशी संबंध नाही—त्यामुळे total development शी संबंध नाही. Small islands in themselves!

◻



# बँकॉक ते कोसबाड

मी स्वत: पदवीधर नसल्यामुळे 'शिक्षण' ह्या विषयाशी माझा अधिकृत संबंध कधी काळी येईल असे वाटले नव्हते. नोकरीची सुरवात कॅमेरामन म्हणुन झाली. खांद्यावर मुव्हीकॅमेरा घेऊन, पायाला भिंगरी लावल्याप्रमाणे चार वर्षे आशिया गरगर भटकलो. १९६३ ते १९६६ ह्या काळात आग्नेय आशियात तर इतक्या प्रचंड घडामोडी चालू होत्या की, कॅमेऱ्याला विषयांची वाण कधीच पडली नाही. ह्या भटकंतीचा खूप फायदा झाला. फिल्मचे विषय राजकीय, क्वचित सांस्कृतिक. त्यामुळे अनेक क्षेत्रांतील माणसांच्या गाठीभेटी पडल्या, अनेक राजकीय घटना जवळून अभ्यासता आल्या. इतिहास, भूगोल, समाजशास्त्र आणि राजकारण ह्या विषयांचा नव्याने अभ्यास करण्याची प्रेरणा मिळाली. वाचन वाढले, चिंतन करण्याची सवय लागली. केवळ कॅमेरामन म्हणून काम करण्यातला आनंद हळूहळू कमी झाला आणि जून १९६६ ला मी जर्मन टेलिव्हिजनचा राजीनामा दिला.

एक वर्ष फ्री लान्सिंग केले. १९६८ साली युनोचे आमंत्रण आले आणि Development Support Communication Service ह्या प्रॉजेक्टचा दिग्दर्शक-कॅमेरामन म्हणून बँकॉक येथे नोकरीची सुरुवात झाली. युनोच्या ह्या नोकरीत सतत संबंध विकास आणि विकास योजनांशी. त्यामुळे नव्या अभ्यासाची सुरुवात झाली. Development FOR People ऐवजी Development is People हे नवीन सूत्र ध्यानात आले. विकासोन्मुख आणि विकास-साहाय्यक फिल्म बनविण्यासाठी विकासयोजना काळजीपूर्वक समजावून घेणे आवश्यक ठरू लागले. अशा प्रकारच्या films बनविताना such films cannot be a medium of self-expression. It has to be a tool of Communication ही एक नवीन जाणीव झाली. त्यातून संपूर्ण विचारसरणीतच फरक पडू लागला. वाचन खूप वाढले. भिन्न भिन्न विषय हाताळता हाताळता कॅमेरामनचा फिल्ममेकर झालो आणि शेवटी विकासयोजनात एक कार्यकर्ता म्हणून सक्रिय भाग घेऊ लागलो.

१९७१-७२ साली 'शिक्षण' ह्या विषयाचा अधिकृत संबंध अफगाणिस्तानमध्ये आला. 'किताब काफी नीस्त' (केवळ पुस्तक पुरेसे नाही–) ही पंचेचाळीस मिनिटांची शैक्षणिक फिल्म अफगाणिस्तानच्या विद्यार्थी-शिक्षकांसाठी तयार केली. जॉन अॅलन नावाचा युनेस्कोचा शिक्षणतज्ज्ञ सल्लागार म्हणून काम पाहात होता. जॉन अॅलनचा पारंपारिक शिक्षणावर अजिबात विश्वास नव्हता. 'शाळा म्हणजे मुलांच्या जिज्ञासा ठेचणारे कोंडवाडे' असे तो नेहमी म्हणायचा. महिनाभराच्या त्याच्या सहवासातून बरेच काही शिकायला मिळाले. नवा दृष्टिकोन तयार झाला.

'मूल कसे शिकते ?' ही दुसरी शैक्षणिक फिल्म मी अफगाणिस्तानसाठी तयार केली. ह्या फिल्मचे संपूर्ण दिग्दर्शन आणि संकलन मी केले. प्राथमिक शाळेतील मुलांना योग्य शिक्षणानुभव देण्यासाठी साधनांची गरज आहे आणि ही शैक्षणिक साधने आजूबाजूस मिळणाऱ्या साध्यासुध्या गोष्टींतून कुठलाही कल्पक शिक्षक बनवू शकतो असा एक महत्त्वाचा विषय फिल्ममध्ये चित्रित केला होता. ह्या फिल्मबद्दल माझ्या एका भारतीय स्नेह्याला माहिती सांगत असताना त्यांनी मला जमल्यास डहाणूजवळ असलेल्या कोसबाड येथे जाऊन ताराबाई मोडकांची भेट घेण्याचा सल्ला दिला. ताराबाई मोडकांच्या कार्याबद्दल त्या स्नेह्याने जी माहिती दिली त्यावरून माझ्या लक्षात आले की, १९७२ साली फिल्ममध्ये मी जे सांगण्याचा प्रयत्न करीत होतो त्याबद्दलचे सर्व प्रयोग ताराबाईंनी १९२६ सालापासून केलेले आहेत. ताराबाईंना भेटण्यासाठी मी उत्सुक झालो. रजा घेऊन मुंबई गाठली. तेथून सरळ कोसबाड !

ऐंशी वर्षांच्या ताराबाई मोडकांनी अगोदरची ओळखपाळख काहीही नसताना, प्रसन्न मुद्रेने आणि अतिशय प्रेमाने स्वागत केले. त्यांच्या साहाय्यक श्रीमती अनुताई वाघ यांनी दिवसभर सर्वत्र फिरून ग्राम बाल शिक्षा केंद्राची माहिती दिली. कुरणशाळा, पाळणाघर, अंगणवाड्या, बालवाड्या, हस्तव्यवसायकेंद्र सर्व पाहता पाहता मती गुंग झाली. तुटपुंज्या सरकारी मदतीवर, कुठल्याही परदेशी संस्थांकडून मदत न घेता एक महान कार्य ताराबाई आणि अनुताई करीत होत्या. त्यांच्या त्यागाची, जिद्दीची आणि अविरत श्रमांची निशाणी मी पदोपदी पाहून थक्क झालो.

विकासवाडी योजनेबद्दल माहिती सांगताना बालशिक्षणाचे, विद्यार्थी-पालक-शिक्षक यांच्यातील संबंधाबद्दलचे काही मूलभूत शैक्षणिक सिद्धांत ताराबाईंनी समजावून सांगितले. वयोवृद्ध आणि जीर्ण शरीराच्या ताराबाईंबरोबर बोलताना एका गोष्टीची वारंवार जाणीव होत होती–नुकत्याच उमललेल्या एखाद्या टवटवीत डेरेदार गुलाबासारखे त्यांचे मन ताजे होते. अतिशय प्रसन्न. पहिल्या भेटीतच मी ताराबाई मोडकांच्या विचारसरणीने संपूर्णपणे भारावून गेलो.

कोसबाड येथील ताराबाई मोडकांची भेट हा मी माझ्या आयुष्यातला एक महत्त्वाचा टप्पा मानतो. कोसबाडहून बँकॉकला परतलो आणि रात्रंदिवस विकासवाडीचे विचार मनात घोळू लागले. सकाळ-संध्याकाळ बायकोबरोबर चर्चेचा विषय एकच–

ताराबाई मोडक आणि विकासवाडी.

एकदा संध्याकाळी मुलांच्या खोलीतला एअरकंडिशनर बंद पडला. बँकॉकचा उन्हाळा प्रचंड. मोठी मुलगी, वय वर्षे सात-आठ, कुरकुर करू लागली. तिला झोप येईना. ते पाहून बायकोची झोप उडाली. इतक्या लहान वयातच पोरींना ऐषारामाची सवय लागली तर पुढे कसे व्हायचे ? तिने निर्णय घेतला. चारी पोरींना काखोटीला मारले (वय वर्षे आठ, सहा, चार आणि दीड) आणि सरळ कोसबाड गाठले. वर्षभर ती कोसबाडला राहिली, छोटी पाळणाघरात, बाकीच्या बालवाडी आणि विकासवाडीत.

ताराबाई मोडक आणि अनुताई वाघ ह्यांच्या सहवासामुळे पूर्वप्राथमिक आणि प्राथमिक शिक्षण ह्या विषयांचा अभ्यास सुरू झाला आणि सध्या चालू असलेल्या शिक्षणपद्धतीबद्दल, शिक्षणाकडे पाहण्याच्या पालकांच्या दृष्टिकोनाबद्दल मनामध्ये नाना विचारांनी थैमान घातले.

आजकालचे बहुतेक सगळे सुशिक्षित आईबाप आपल्या पहिल्या मुलाच्या जन्मापासूनच त्याच्या शिक्षणाच्या चिंतेने ग्रासलेले आढळतात. अशा पालकांच्या 'खास' सोयीसाठी मुंबई, दिल्ली इत्यादी मोठ्या शहरांत काही 'खास' शाळादेखील आहेत. ह्या शाळांमधुना मूल जन्मताच त्याचे नाव नोंदवून, हजार-बाराशे रुपये डिपॉझिट भरून – सहा वर्षे अगोदर अॅडमिशन मिळवावी लागते. आईबापांचा खिसा कापणाऱ्या ह्या शाळा, शिक्षणाचा धंदा कसा करावा, ह्याची उत्तम उदाहरणे आहेत.

असल्या महागड्या शाळांच्या 'शिस्तीत' तयार झालेली बहुतेक सर्व मुले संकुचित मनाची, तोकड्या विचारांची आणि उर्मट बनतात. चार इंग्रजी वाक्यांच्या जोरावर, इंग्रजी न समजणाऱ्या आपल्या वयाच्या इतर मुलांना आणि वडीलधाऱ्या माणसांना, ही मुले तुच्छ लेखतात. घरामध्ये हास्यास्पद इंग्लिश भाषेत एकमेकांशी बोलतात आणि कधीही न पाहिलेल्या आणि अनुभविलेल्या – अमेरिकन वातावरणाचे अनुकरण करण्याची केविलवाणी धडपड करतात. ह्यांना भावगीत, गजल, ठुमरी, रागदारी संगीत ह्यापेक्षा 'वेस्टर्न म्युझिक' ऐकणे जास्त उच्च दर्जाचे वाटते आणि दुर्दैव असे की ह्या पोरांचे 'पप्पा' आणि 'मम्मी' किंवा 'डॅड' आणि 'मॉम' ह्या अंधानुकरणाचे मनमोकळे कौतुक करीत त्याला प्रोत्साहन देतात.

मुलाची योग्य प्रकारे बौद्धिक वाढ होण्यासाठी त्याला तिसऱ्या-चौथ्या वर्षापासून पूर्वप्राथमिक शिक्षणाची गरज आहे हा एक मानला गेलेला सिद्धांत आहे; पण सध्या भारतात चालू असलेला पूर्वप्राथमिक शिक्षणाचा सावळागोंधळ अभ्यासण्यासारखा आहे. खेडोपाडी बालवाड्यांचा सुळसुळाट झाला आहे. बहुतेक बालवाड्या – पूर्वप्राथमिक शिक्षण कसे असू नये – त्याचे प्रतीक आहेत. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील बालवाडी चालविणाऱ्या बालसेविकेचा पगार, सरासरी महिना पंधरा रुपये आहे – तोसुद्धा नियमित मिळेलच असे नाही. अनेक बालसेविका 'ट्रेनड्' आहेत आणि प्रत्येक 'ट्रेनड्' बालसेविकेमागे सरकारला हजार–दीड हजार रुपये खर्च आलेला आहे; पण जेव्हा ही 'ट्रेनड' बालसेविका तिच्या खेड्यात परत जाते – पंधरा-वीस रुपयांची नोकरी करण्यासाठी, तेव्हा तिला सरकारकडून कसलाच पाठिंबा मिळत नाही. खेड्यातली नको असलेली एखादी झोपडी तिला बालवाडी चालविण्यासाठी मिळाली तरी नशीब! बालसेविकेचे मुख्य काम मुले गोळा करणे, त्यांना अंघोळी घालणे, त्यांचे केस विंचरणे, उवा काढणे आणि नाके पुसणे – इतर कुठल्याही शैक्षणिक गोष्टी करण्यासाठी ती पूर्णपणे असमर्थ असते. बालवाडी चालविण्यासाठी ज्या साधनांची आवश्यकता आहे त्यासाठी पैसे खर्च करायला – फक्त सातशे-आठशे रुपये – जिल्हा परिषद किंवा ग्रामपंचायत पुढे येत नाही. असल्या परिस्थितीत, लाजिरवाण्या वेतनावर काम करणाऱ्या त्या तरुण बालसेविकेने, मुलांना उमेदीने शिकवून त्यांच्यात जागृती निर्माण करावी अशी अपेक्षा करणे चूक आहे. सरकारला, जिल्हा परिषदेला किंवा ग्रामपंचायतीला खेड्यामध्ये बालवाडी चालवायची असेल तर त्यासाठी बालसेविकेला हरप्रकारची मदत करण्यासाठी त्यांनी उत्साहाने पुढे आले पाहिजे. एरवी ह्या असल्या नाममात्र बालवाड्या ग्रामीण मुलांच्यात कसलीही जागृती करू शकणार नाहीत. ही ग्रामीण मुले अशीच मागासलेली रहातील – शहरी मुलांच्या सदा मागे रहातील आणि ह्याला सर्वस्वी जबाबदार ग्रामपंचायत, जिल्हा परिषद आणि सरकार राहील ! बालवाड्यांच्यावर जेवढा पैसा खर्च करणे आवश्यक आहे तेवढा झालाच पाहिजे, ग्रामपंचायतीच्या आणि सरकारच्या इतर प्लॅनसमध्ये ह्या बालवाड्यांना त्यांचे योग्य स्थान आणि मदत मिळालीच पाहिजे !

भारताच्या कुठल्याही ग्रामीण भागात जाऊन पहा. मोकळी भटकणारी मुले हसऱ्या चेहऱ्याची, बोलक्या डोळ्यांची आणि बरीचशी निरोगी वाटतात. त्याउलट ग्रामीण भागातील कुठल्याही बालवाडीत जा – निर्जीव डोळे, निर्जीव चेहरे...दुःखी, एकाकी, हरवलेले आणि कंटाळलेले. मी भारतातही भटकलो आहे. खूप खेडी पाहिली आहेत आणि अनेक बालवाड्या! कुठल्याही बालवाडीत मला हसरे चेहरे आणि बोलके डोळे पहायला मिळाले नाहीत. लहान-मुलामध्ये जन्मजात नवीन गोष्टी शिकण्याची आवड असते – they have extremely curious add alert minds; पण आमच्या बालवाड्या मुलाच्या जागृत मनाला निष्प्राण बनवितात. ही कोवळी मने पूर्णपणे उमलण्याअगोदरच मिटविणे हे फार मोठे पाप आहे! हे सगळे बदलले पाहिजे झपाट्याने. बालवाड्यांची संख्या दिवसेनदिवस वाढते आहे आणि त्याचबरोबर दुर्मुखलेल्या चेहऱ्यांच्या, मेलेल्या मनांच्या, हसणे विसरलेल्या उदास चेहऱ्यांची. शिवाजीमहाराजांच्या नावाने जयजयकार करणारे लोक उडप्यांची दुकाने जाळणे, 'सखाराम बाइंडर'वर मोर्चा काढणे असले विध्वंसक प्रकार सोडून खेड्यातील बालवाड्या सुधारण्यासाठी स्वतःची बुद्धी, शक्ती आणि पैसा खर्च करतील तर महाराष्ट्राचे काही तरी भले होईल ! नाही तर मेल्या मनाचे खेड्यातले हे अजाण पोर आणखी वीस वर्षांनी 'शिवाजी महाराज म्हणजे कोण ?' असा साधा सरळ भोळा प्रश्न विचारील – and then it will be too late !

पूर्वप्राथमिक शिक्षणाचे दुसरे टोक म्हणजे शहरातून चालणाऱ्या 'पिकी-विकी', 'टॉडलर्स होम', 'सिंड्रेला' इत्यादी इंग्रजी नावांच्या प्रायव्हेट संस्थांनी चालविलेल्या किंडरगार्टन नामक पूर्वप्राथमिक शाळा. काहींची महिना फी तीनशे ते चारशे रुपये आहे. अशा

किंडरगार्टनमध्ये जाणारी तीन-चार वर्षांची ही छोटी छोटी भारतीय मुले लहान वयातच आईबापाला 'डॅडी...', 'ममी' म्हणू लागतात आणि खेड्यातील त्यांच्या वयाच्या इतर मुलांपेक्षा एका वेगळ्या 'कल्चर'मध्ये वाढतात. ही मुले जेव्हा तरुण होतील तेव्हा त्यांच्यात आणि खेड्यातल्या मुलांत भयानक मोठी 'गॅप' असेलच— दोन भारतीय तरुण एकमेकांना समजू शकणार नाहीत आणि तेव्हा भारत नावाचा देश उरणार नाही!

शहरातल्या किंडरगार्टनमध्ये जाणाऱ्या ह्या कोवळ्या पोरांचे निर्बुद्ध आईबाप, घरी आलेल्या प्रत्येक पाव्हण्यासमोर आपल्या 'सनी' किंवा 'पिंकी'च्या इंग्रजी ज्ञानाचे न चुकता प्रदर्शन करतात. पाव्हण्याला 'जॅक ॲन्ड जिल' आणि 'ट्विंकल् ट्विंकल लिटल स्टार' असले काही तरी भयानक उच्चारात म्हटलेले गाणे हसऱ्या चेहऱ्याने ऐकावे लागते. असला शिसारी आणणारा प्रसंग ह्या 'अंकल'वर अनेक वेळा आला आहे. काही इंग्रजी कविता ऐकून मला भोवळ आली आहे—

लॉंग पुडिंग खो ऽ, पुटीट इन् द हो ऽ
लॉंग इज द हो ऽ, लॉंग इज द खो ऽ

आता ह्याचा अर्थ काय लावायचा? कपाळ!! हे असले काही तरी निरर्थक आपल्या पोराला यावे म्हणून महिना चारशे रुपये खर्च करणाऱ्या आईबापांना माझा शिरसाष्टांग दंडवत! कशासाठी हा अट्टाहास? हा वैताग?

मूल चालायला लागल्यापासूनच शिक्षणाच्या नावाखाली हे सुशिक्षित आईबाप, त्याच्या पायांत बेड्या अडकविण्याचा का प्रयत्न करतात समजत नाही. लहान मुलाची अनेक गोष्टी शिकण्याची, जाणून घेण्याची, अनुभविण्याची सहाजिक प्रवृत्ती असते. नवीन नवीन अनुभव आत्मसात करून भोवतालच्या जगाची ओळख पटवून घ्यायच्या सतत धडपडीत मूल असते. ह्या संवेदनाक्षम मनाला आपणहोऊन शिकण्याचा, स्वतःच्या अनुभवातून ज्ञान मिळविण्याचा जास्तीत जास्त मोका दिला पाहिजे; पण त्याला पूर्ण स्वातंत्र्य देऊन आपणहोऊन शिकू देण्याकडे पालकांचा कल कमी. मुलांना स्वातंत्र्य द्यायला पालक घाबरतात. असे करू नको— तसे कर; हे करू नको— ते कर; हे नको —ते नको; असे बोलू नये— तसे बोलावे; वेडी मुले अशी वागतात— चांगली मुले सांगितलेले ऐकतात. सतत त्या मुलावर बळजबरी! सतत त्याला गाईड करायचा प्रयत्न. माझ्या मुलाने माझ्यासारखे व्हावे हा आग्रह का? प्रत्येक मुलाला वेगळे व्यक्तिमत्त्व आहे— ते त्याला स्वतंत्रपणे वाढविण्याची संधी का दिली जात नाही? मी ज्या चाकोरीतून वाटचाल करतोय त्याच चाकोरीतून माझ्या मुलाने चालावे ह्या आग्रह का?— विश्वनाथ हरीहर काळे असे बापाचे नाव मध्ये घालून संपूर्ण नाव लिहिण्याचा आग्रह का? संपूर्ण नाव लिहायचेच असेल तर विश्वनाथ हरिहर मंजुळा काळे असे आई आणि बाप दोघांचेही नाव मध्ये का नको? पोर काय एकट्या बापामुळेच जन्माला आले? विश्वनाथ काळे लिहिले तर बिघडले कुठे? आणि काळे लिहायची तरी जरूर काय? नुसतेच विश्वनाथ हेच खरे नाव. कारण विश्वनाथ ही एक स्वतंत्र व्यक्ती आहे; पण ह्या विश्वनाथला त्याचा बाप— हरीहर शंकर काळे, बापाचे नाव मध्ये लावणारा— स्वतंत्रपणे विश्वनाथ म्हणून वाढू द्यायला कचरतो!

बहुतेक प्रत्येक सुशिक्षित पालक आपल्या मुलाला, त्याच्या तिसऱ्या किंवा चौथ्या वाढदिवसाच्या दिवशी ड्रॉइंगची वही आणि रंगीत पेन्सिली आणून देतात— पण वहीतले, पहिल्या पानावरचे पहिले चित्र बहुतेक वेळा पालकांनीच काढलेले असते. फेमस चित्र आहे. त्रिकोनी त्रिकोनी डोंगर, त्यामधून उगवणारा (मावळणारा?) सूर्य, नदी— तिच्यात शिडाची होडी, काठाला नारळाचे झाड— त्या खाली झोपडी आणि आकाशात चारच्या आकाराचे कावळे आणि ते मूल नकळत तसलीच अनेक चित्रे काढते. सुरुवातीपासूनच बापाने त्या मुलाच्या कल्पनाशक्तीला त्रिकोणी डोंगरामधून उगवणाऱ्या सूर्याचे बंधन घातलेले असते आणि एरवी बापाबरोबर फिरायला बाहेर पडले असताना खरे डोंगर बघून 'बाबा, हे डोंगर बघ आईच्या दुदुसारखे दिसतात' असे म्हणायची मानसिक ताकद असलेले ते मूल, काही तरी नवीन— ओरिजिनल— निर्माण करण्याऐवजी फक्त सपाट, त्रिकोणी डोंगर 'गिरविण्यास' शिकते. नकळत त्याला सवय लागते. ही सवय वाढत जाते. अनेक लहान मुलांच्या वहीमध्ये मी हे उगवत्या सूर्याचे चित्र पाहिले आहे; पण मला खरा आनंद होतो रेघोट्या ओढलेली, रंगाने गिचमिड भरलेली वही बघायला. असा आनंद क्वचितच मिळतो.

लहान मुलाला स्वतंत्रपणे विचार करू दिला पाहिजे. त्याला स्वतःच्या विचारांना मुक्तपणे स्वरूप देण्याची सवय झाली पाहिजे. चूक का बरोबर? असली भीती त्याला लहान वयात वाटून उपयोग नाही. माझ्या ओळखीच्या कुटुंबातली एक पाच-सहा वर्षांची, अतिशय हुषार मुलगी, चूक का बरोबर, ह्या भीतीने सतत बावरलेली मी पाहिली आहे. ती एकटी, स्वतःत रमलेली असते, तेव्हा ती सर्व गोष्टी अतिशय ग्रेसफुली आणि मोकळेपणाने करीत असते; पण जेव्हा तिचे पालक तिला पाव्हण्यासमोर उभे करतात— एखादे गाणे म्हणायला किंवा नाच करायला— तेव्हा क्षणापूर्वी अतिशय ग्रेसफुल आणि मोकळी असलेली ती मुलगी थिजते— बिथरते— आपल्या आईबाबांकडे वारंवार पहात, आपले काही तरी चुकत तर नाही ना, अशा प्रेशरखाली अतिशय मेकॅनिकली ते गाणे म्हणते किंवा नाच करून दाखविते. मुलाने प्रत्येक गोष्ट नेहमी 'बरोबर' केली पाहिजे हा आग्रह का?

रंगीत पेन्सिलीने त्या मुलाने नुसत्या रेघोट्या ओढल्या तरी हरकत नाही. तशा रेघोट्या ओढण्याचा त्या मुलाचा आनंद हिरावून घेणे चूक आहे; पण पालकाला काळजी असते कागदाची— वहीतला पहिला कागद वाया जाऊ नये याची! पालकांच्या दृष्टीने वहीतल्या पहिल्या कागदाला वाजवीपेक्षा जास्त महत्त्व दिले जाते. वहीतल्या पहिल्या कागदापेक्षा शेवटच्या कागदावर काय आहे हे जास्त महत्त्वाचे आहे. अनेक कागद 'खराब' करावे तेव्हा कुठे एक धड वाक्य लिहिले जाते— एक चांगले चित्र रेखाटले जाते. मुलाने रेघोट्या ओढलेला कागद कधीच वाया जात नाही. वाया जातो त्रिकोणी डोंगर, उगवता सूर्य आणि नारळाचे झाड काढलेला कागद! असे लाखो कागद पालकांनी आजपर्यंत वाया घालविले आहेत— त्यात भर घालण्यात अर्थ नाही. मुलाला ड्रॉइंगची वही आणि रंगीत पेन्सिली दिल्यानंतर— त्याच्या कोऱ्या वहीतला, पहिला कोरा कागद, त्या

मुलाला त्याच्या मनाप्रमाणे रंगवू द्या !

लहान मूल शिकते कसे ? ह्यावर अनेक शिक्षणतज्ज्ञांनी अनेक प्रयोग करून अनेक विचार मांडले आहेत– and they all agree that children learn.

– through games & activities.

– by doing things themselves.

– through observation & curiosity.

– and by self–experience.

किती पालक किंवा शिक्षक मुलांना वरील चार गोष्टींचे स्वातंत्र्य देतात ? लहान वयात वाईट सवयी नकोत, ह्या काळजीने अनेक पालक आपल्या मुलांना खऱ्या जीवनापासून, खऱ्या शिक्षणापासून पारखे ठेवतात. हात घाण करू नको, पाय घाण करू नको, कपडे खराब करू नको, त्या ' घाणेरड्या ' मुलांच्याबरोबर खेळू नको... किती बंधने ! !

मुलाला नुसत्याच चांगल्या गोष्टी, चांगल्या सवयी, चांगले शब्द, चांगले विचार असे सगळेच नुसते चांगले शिकवून कसे चालेल ? अशा तथाकथित ' चांगल्या ' वातावरणात वाढलेली मुले– चांगली मुले– जेव्हा स्वतःच्या पायावर उभे राहून जगात बाहेर पडतील, तेव्हा हे जग नुसत्या चांगल्या गोष्टींनी भरलेले नाही ह्याची जाणीव होताच प्रचंड हादरतील, खचतील– गोंधळून जातील ! मुलाला बरे-वाईट दोन्ही समजले पाहिजे, दोन्हीचा अनुभव पाहिजे. बरेवाईट तोलून स्वतःला जे योग्य वाटेल ते करण्याची मानसिक ताकद पाहिजे. त्यासाठी त्याला स्वतंत्र विचार करण्याची सवय लहानपणापासूनच लागणे आवश्यक आहे. वहीच्या पहिल्या कोऱ्या कागदापासून ! ◻

---

# जिथे कावळे तिथे हिंदुस्थानी

भारतात परत येऊन काही आठवडेच लोटले होते आणि एके दिवशी तीन वेळा तीन वेगवेगळ्या ठिकाणी एकाच प्रकारचा प्रश्न आणि विचार ऐकावा लागला. प्रश्न विचारणारे आणि विचार प्रकट करणारे वेगवेगळ्या व्यवसायांमधील आणि त्या व्यवसायासाठी आवश्यक असलेल्या बुद्धिमत्तेचे–पण आश्चर्य म्हणजे सर्वांच्या प्रश्नाचा रोख एकच आणि विचारसरणीत देखील फारसा फरक नाही.

संध्याकाळी माझ्या डॉक्टरमित्राच्या नवीन दवाखान्याचे उद्घाटन होते. गेलो. तिथे डॉक्टर भेटले. ओळखपाळख झाली. मी युनोमध्ये होतो हे ऐकताच डॉक्टर फाडकन् म्हणाले,

' मग काय तुम्ही भरपूर पैसा केला असणार ?'

मला जरा हसू आले आणि थोडासा राग देखील.

मी विचारले, ' कशावरून तुम्ही असे म्हणता ?'

डॉक्टर चटकन म्हणाले–' अहो, माझ्या ओळखीचे दोघे होते युनोमध्ये. दोन वर्षांची असाइन्मेंट. भरपूर पैसा केला त्यांनी ! तो देखील टॅक्स फ्री आणि भारतात येऊन मोठा बंगला बांधला... म्हणून म्हटले... तुम्ही इतकी वर्षं होतात... तेव्हा...'

मी डॉक्टरांना हाताने खूण करून आवरले आणि समजावले, ' तुमचे म्हणणे एका अर्थी बरोबर आहे... युनोमध्ये पगार भरपूर मिळतो आणि तो देखील टॅक्स फ्री... त्यामुळे पैसा मिळविण्यासाठी आणि साठविण्यासाठी, जे युनोची नोकरी मिळवितात ते आपला कार्यभाग यशस्वीरीत्या पार पाडतात देखील. सरकारी नोकरीमधून निवृत्त होण्याअगोदर एकदोन वर्षांच्या कॉन्ट्रॅक्टवर अशी मंडळी युनोमध्ये येतात.. सहाजिकच त्यांच्या कल पैसे जमा करण्यामागे असतो. त्यात चूक काहीच नाही; पण म्हणून तुम्ही युनोची नोकरी म्हणजे केवळ भरमसाठ पैसे मिळविण्याची संधी असे गणित घालू नका ! मला स्वतःला फार तरुण वयात युनोची नोकरी मिळाली. त्यांच्या आमंत्रणावरून. मला मिळणारा भरमसाठ पगार हा माझ्या दर्जाप्रमाणे दिला जात आहे ह्या जाणिवेने त्या दर्जाला योग्य असे राहणीमान ठेवायचे असे मी आणि माझ्या बायकोने सुरुवातीपासूनच ठरविले; त्यामुळे भरमसाठ पैसा आमचा साठला नाही. जो साठला तो incidental म्हणून; पण आम्ही भरमसाठ भटकलो, भरमसाठ जीवन जगलो आणि भरमसाठ काम केले ! त्या कामातून जे अनंत अनुभव मिळविले तीच सर्वांत मोठी खिदोरी गोळा करून तृप्त मनाने भारतात परतलो ! डॉक्टरमहाशयांचा माझ्या सांगण्यावर फारसा विश्वास बसला असेल असे त्यांच्या चेहऱ्यावर दिसत नव्हते. म्हणूनच ते पुटपुटले,

' पण युनोची नोकरी केलीत म्हणूनच पुण्यात ब्लॉक घेऊ शकलात हे खरे ना ?

अनुभवाचे वगैरे सोडा. ते आम्हाला देखील चिक्कार मिळत असतात. पुण्यातच राहून. त्यासाठी परदेशी जाण्याची काय गरज ?' आणि स्वतःच्याच विनोदावर हसत टाळी-साठी त्यांनी हात पुढे केला. मी त्यांना नम्र-पणे नमस्कार करून बाजूला झालो.

डॉक्टरमित्राच्या नवीन दवाखान्याच्या उद्घाटनाचे चहापाणी पिऊन संध्याकाळी घरी परतलो. घरी आमची वाट पहात, माझ्या आईकडची कामवाली आणि तिचा गोतावळा. नवरा, दीर आणि अठरा एकोणीस वर्षांचा एक पोरगा. कामवालीने सरळच विषयाला हात घातला.

'सायेब–आमच्या मालकास्नी आणि ह्या पोराला तुम्ही होता तिथे नोकरी लावून द्या! डुब्बई का कुठे तियेच व्हता नाही का तुम्ही... पुण्याच्या एका गवंड्याने तिथे जाऊन पैसा केला आणि पुण्यात घरे बांधली... तुम्ही येवढे काम कराच ! ...तुमचेबी कल्याण झाले तसेच आमचेबी होऊन जाईल,! ...'

अनेक प्रकारे समजूत घालून ती कामवाली ऐकेना. शेवटी मी सांगितले–' प्रयत्न करतो पण कसले काम करणार तुमचे मालक...?'

'कसलेबी करतील. कामाला कमी नाही पडणार आमचे मालक...पगार भरपूर मिळाला पाहिजे...!'

कामवालीने संपूर्ण तासभर खाल्ला ! संध्याकाळ संपून गेली. रात्रीचा स्वयंपाक करण्याचे राहूनच गेले होते...कारण मी कामवालीची समजूत काढीत असताना बायको तिच्या मालकाची आणि पोरांची समजूत घालीत बसली होती.

जेवणासाठी बाहेर जाण्याचा बेत ठरला. मुले झटपट तयार झाली आणि आम्ही एक ओळखीचे इराणी हॉटेल गाठले. चपाती, कोल्हापुरी मटन आणि चिकन मसाल्याचा आम्ही फडशा पाडीत असताना मालक भेटा-यला आला.

'तेहरानसे कब आये —'

'हो गये कोई तीन महिने...लेकीन अब हम वापस नही जा रहे है –' कोल्हापुरी मटनाने पोळलेली जीभ पाण्याने थंडावत उतरलो.

'क्यूं...नोकरी छूट गया –'

'नही...छोडा...'

'इराण मे आप कितना साल थे... पांच...छे ?'

'चार – साडेचार साल'–जिभेचा चटका कमी होत नव्हता.

'फिर क्या...इतने सालोंमें पैसा तो बहोत बनाया होगा...अब इधर तो बडा मकान खरीदा होगा... '

'हां भाई...' मी त्याच्याशी वाद घालण्याऐवजी पुन्हा एकदा कोल्हापुरी मट-नाचा भुरका मारून जळणाऱ्या जिभेची आग भडकवून पोटापर्यंत पोहोचविली.

परदेश नोकरी म्हणजे बख्खळ पैसा ! सर्वांचा हिशोब एकच सहज मनात विचार आला... एखादा फिलिपिनो, इंडोने-शियन, इराणी, युरोपियन किंवा अमेरिकन जेव्हा भारतात – म्हणजे त्याच्या दृष्टीने परदेशात येतो तेव्हा तोसुद्धा प्रथम पैसा असेच म्हणत असेल का ?

शिक्षणासाठी परदेशात जाऊन योग्य शिक्षण घेऊन मायदेशी परत आल्यावर आपल्या ज्ञानाचा इथे उपयोग व्हावा म्हणून धडपडणारे फार थोडे ! त्यांपैकी काही अत्यंत आदरणीय तरुण माझ्या पहाण्यात आले आहेत. त्यांच्याशी बोलून, त्यांचे विचार ऐकून मन अनेक वेळा प्रसन्न झाले आहे, त्यांच्या अल्पशा सहवासानेदेखील मी प्रभा-वित झालो. त्यांच्याकडून बरेच काही नवीन शिकलो; पण अशी माणसे विरळा! 'फोरेन रिटर्न्ड' माणसे मात्र खूप भेटतात गल्लो-गल्ली. त्यांची जात वेगळी. उरले नोकरी-साठी जाणारे, गेलेले आणि व्यापारधंद्या-निमित्त स्थायिक झालेले (आणि बर्मा, युगांडा येथून हाकलले गेल्यानंतर आप-आपले 'ब्रिटिश सब्जेक्ट' पासपोर्टस उराशी धरून भारतात किंवा इंग्लंड, कॅनडा, ऑस्ट्रेलिया इथे पुनर्वसित झालेले. )

ह्या संदर्भात बर्मामधले काही अनुभव आठवतात.

१९७० साली रंगूनला दुसऱ्या खेपेला भेट देण्याचा मोका जेव्हा आला तेव्हा सह-कुटुंब, सहपरिवार जाण्याचा मी निश्चय केला. मंडाले, टिळकांची खोली – हे बायको-मुलांनी पहावे हा हेतू होताच; पण त्याच-बरोबर बर्मा त्यांनी पहावा, बर्मीज लोकांशी बोलावे, त्यांची रहाणी, आचारविचार पहावेत असे मला मनापासून वाटत होते.

पहिल्या भेटीत मी जो बर्मा पाहिला, जी खरीखुरी बर्मीज माणसे माझ्या सहवासात आली त्यामुळे माझ्या सर्वच विचारांना (बर्माबद्दलच्या) एक वेगळी दिशा प्राप्त झाली होती. बर्माबद्दल आपल्याला अशी माहिती कुणीच का दिली नाही ? – माझे बर्माबद्दलचे ज्ञान किती तोकडे आणि एकांगी होते ह्याची वारंवार जाणीव मला प्रथम भेटीतच झाली होती. बर्मा बॅकवर्ड आहे. तिथे डिक्टेटरशिप आहे....बर्मीज सर-कारला कसलीही सांस्कृतिक दिशा नाही, आर्थिक प्रगतीबद्दल अनास्था असलेले सरकार – स्वतंत्र विचारसरणीला मज्जाव असणारी राजवट...वगैरे वगैरे. फालतू वर्तमानपत्रकारांचे लेख वाचून वरीलप्रमाणे मते सहाजिकच बनली होती. (म्हणूनच मला पाश्चिमात्य वृत्तवितरणसंस्थांबद्दल आदर नाही, विश्वास नाही आणि त्यांनी प्रसारित केलेल्या वृत्तावरून आंधळी एकांगी मते बनवून, रकानेच्या रकाने भरून न्यूज-प्रिंट वाया घालविणाऱ्या आशियायी वृत्त-पत्रांवर तर नाहीच नाही ! )

बर्मा मला प्रत्यक्ष पहायला मिळाला आणि पाश्चिमात्य विचारसरणीचा चष्मा न लावता स्वतंत्र मनाने बर्मा अनुभविता आला. तशी संधी मला दिली गेली याबद्दल मी बर्मीज लोकांचा ऋणी आहे.

दुसऱ्या भेटीच्या वेळी मी बायको-मुलींसह आलो आहे हे कळताच बर्माचे शिक्षणमंत्री डॉक्टर नी नी ह्यांनी प्रेमाचा निरोप पाठवून संध्याकाळी सर्वांना घरी बोलावून घेतले. आपल्या अनेक मंत्र्यांनी धडा गिर-वावा अशी त्यांची रहाणी...साधी रहाणी आणि सर्वसामान्यांना बोध होईल अशी स्वच्छ विचारसरणी म्हणजे डॉक्टर नी नी !

सहा वारी पातळातील माझ्या बायकोकडे पाहून डॉ. नी नी प्रसन्न मुद्रेने हसले आणि आपल्या शांत आणि स्पष्ट शब्दात त्यांनी विनंतीवजा caution दिली –

'बर्मामध्ये तुम्ही रंगूनव्यतिरिक्त इतर ठिकाणीदेखील फिरणार आहात...छोट्या शहरातून किंवा खेड्यातून साडी परिधान केलेली भारतीय स्त्री बरेच वर्षांनंतर लोकांच्या नजरेस पडणार...रंगूनमध्ये

त्याचे कुणाला फारसे वाटणार नाही... वाटल्यास प्रतिक्रिया व्यक्त केली जाणार नाही...आमची माणसे साधी आहेत... तरीदेखील एखाद्या वेळेस...एखाद्या छोटया शहरात...तुमच्याशी कुणी अपमानास्पद बोलले तर कृपा करून गैरसमज करून घेऊ नका...मला खात्री आहे तसे काही घडणार नाही...पण जर तुम्हाला तसा अनुभव आला तर मनात ठेवू नका...एखाद्या बर्मीज माणसाशी तशी प्रतिक्रिया झाली तर त्याला सबळ कारणे आहेत...इंग्रज राजवटीत बर्मामध्ये भारतीयांची मोठी वसाहत होती...वर्मा हा ब्रिटिश एंपायरचा एक भाग होता (डॉक्टर नी नी ब्रिटिश इंडिया हा शब्द सफाईदारपणे टाळून गेले) ... दुसऱ्या महायुद्धामध्ये भारतीय जवानांनी इथे आत्मसमर्पण केलेले आहे. त्यांच्याबद्दल प्रत्येक बर्मीज व्यक्तीच्या मनात आदाराशिवाय दुसरी कुठलीच भावना नाही; पण स्वातंत्र्यानंतर हळूहळू भारतीय व्यापारी बर्मीज अर्थव्यवस्थेवर संपूर्ण पगडा बसविण्याइतके सामर्थ्यवान झाले. ह्या व्यापाऱ्यांच्यात बर्मीज लोकांच्या जमिनी, घरे गहाण ठेवून कर्ज देणाऱ्यांचा भरणा जास्त. चेट्टीयार लोकांचा हाच मुख्य धंदा. त्यामुळे काही कालावधीतच बर्मामधील इंच आणि इंच जमीन बेकायदेशीर सावकारी करणाऱ्या भारतीयांच्या ताब्यात गेली... प्रत्येक बर्मीज अशा सावकारांचा गुलाम झाला. त्यावरून बर्मामध्ये एक नवीन म्हण प्रचारात आली– 'जिथे उकिरडा तिथे कावळे– आणि कावळ्यांच्या नजरेतून सुटलेले उचलण्यासाठी भारतीय सावकार!' दुसरी सुद्धा म्हण आहे– 'साप आणि भारतीय सावकार समोर आले तर सापाला सोडा सावकाराला ठेचा!' भारतासारखा बलाढ्य देश आमचा शेजारी. आम्हाला बंधुत्वाचे नाते टिकवून ठेवायची मनापासून इच्छा, पण ह्या सावकारी पाशातून मुक्त होण्यासाठी, त्यांना त्यांच्या मायदेशी परत धाडण्याखेरीज दुसरा पर्यायच आमच्यापुढे नव्हता. भारत नाराज झाला असणार. भारतामधील वृत्तपत्रांनी आमची बाजू भारतीयांना कितपत समजावून सांगण्याचा प्रयत्न केला त्याची मला कल्पना नाही. तर बर्मीज लोकांच्या मनात काही कटु भावना खोल दडल्या असण्याची शक्यता मी नाकारीत नाही. अत्यंत क्रूर अशा सावकारी पाशातून पिळून निघालेल्या एखाद्याला साडी परिधान केलेली भारतीय स्त्री पाहून त्या काळाची आठवण नक्कीच होणार; पण आमची माणसे साधी आहेत, सुसंस्कृत आहेत, गरीब आहेत. तुम्ही मुक्तमनाने सगळा बर्मा पहा आणि चुकूनमाकून एखादा कटु अनुभव आलाच तर त्याला महत्त्व देऊ नका!'

डॉक्टर नी नींचे विचार काळीज चिरीत गेले. मोजक्या शब्दांतच आम्हाला न दुखविता एक सत्य त्यांनी आमच्यासमोर मांडले आणि तितक्याच मोजक्या आणि उदार शब्दाने, मुक्तमनाने बर्मा पहाण्याचे आमंत्रण, ते देखील विनंतीवजा दिले.

□

बांगला देशाची लढाई संपली होती. मी काही कामानिमित्त मुंबईला आलो होतो. तिथून पुढे श्रीलंकेला जाण्याचा प्लॅन होता. संध्याकाळी काही ओळखीचे लोक हॉटेलच्या खोलीवर जमले. गप्पांच्या ओघात मी बर्मा आणि सिलोनबद्दल काही सांगत होतो... ग्रुपमधला एक उसळला...

'विज्या...बघावं तेव्हा तुझी पिटपिट... रंगून कसे स्वच्छ– कोलंबोत हे कसे चांगले आहे– थाय माणसांची संस्कृती...यंव आणि त्यंव... बोअर नको करू यार... हे मच्छर देश... त्यांचे आपल्याला काय कामाचे... accept the reality... We Indians are a big power. We can crush there little rats any time we desire... फॉरेनमध्ये राहून तुझा मेंदू बिघडला आहे. You always find faults with our people...' □

---

# संपूर्ण क्रांती अभ्यास वर्ग

## वक्ते : आचार्य दादा धर्माधिकारी

पाच जून एकोणिसशे चौऱ्याहत्तर हा दिवस आधुनिक भारताच्या इतिहासात विशेष दिवस म्हणून नोंदवावा लागेल, कारण त्या दिवशी लोकनायक जयप्रकाशांनी जाहीर रीतीने संपूर्ण क्रांतीची घोषणा केली. 'संपूर्ण क्रांति यह नारा है, भावी इतिहास हमारा है' ही घोषणा तेव्हापासून देशात दुमदुमत आहे. या घोषणेत केवढा दुर्दम्य आशावाद आणि मानवावरील उदंड विश्वास भरलेला आहे!

संपूर्ण क्रांतीचे तात्त्विक अधिष्ठान समजून घेण्याची नितांत आवश्यकता आहे. त्यासंबंधी विविध पातळींवर चर्चा झाली पाहिजे. कारण इतर क्रांतिविचाराप्रमाणे हा विचार साचेबंद नाही. कोणा महापुरुषाच्या पराक्रमातून ही क्रांती साकार होणार नाही. लोकपुरुषार्थातूनच ही क्रांती समूर्त, साकार व्हायची आहे. प्रबोधनाच्या सुदृढ पायावरच हे घडू शकेल.

आचार्य दादा धर्माधिकारी यांचे विवेचन या दृष्टीने फार महत्त्वाचे म्हणावे लागेल. दादांचे व्याख्यान हा श्रुतिमनोहर आणि विचारोत्तेजक असा अनुभव असतो. मूलभूत मुद्द्यांची विलक्षण अशी सुबोध मांडणी करण्यात दादांचा हातखंडा आहे आयतन विचारांनी ओतप्रोत आणि प्रासादिक अशी त्यांची मांडणी असते. त्याच दृष्टीने कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

पहिले : सकाळी ९ ते ११।। दुसरे सत्र : दुपारी ४ ते ६।।
दिनांक : ५ जून १९७८ जागा : स्नेहसदन, नारायण पेठ, पुणे ३०

त्याच वेळी आचार्य दादा धर्माधिकारी यांच्या 'संपूर्ण क्रांती' या जनबोध प्रकाशनाचे विमोचन होईल.

संपूर्ण क्रांती। लेखक : आ. दादा धर्माधिकारी। पाने ८८। किंमत पाच रुपये।
जनबोध प्रकाशन, चिंचवड, पुणे ३३.

MANOOS ( Marathi Weekly )  1·25 Paise  Regd. No. PNC-68

काँग्रेसऐक्याचे ताबूत
पुन्हा थंडे होऊ लागले.
दादा मंत्रिमंडळाचे
भवितव्य धोक्यात
आहे काय ?

विधानसभेचे पावसाळी
अधिवेशन लवकरच
सुरू होत आहे.
त्यानिमित्त–
खास लेख

पुढील अंकी

माहितगार